१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, रविवार ५ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१२२, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 122 Marathi - Daily - Mumbai, 5 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in

हवामान खात्याकडून विकेंडला 'रेड अलर्ट' जारी!

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## झाडे कोसळली! रस्ते खचले! पाणी तुंबले! जनजीवन विस्कळीत

# मुंबईसह राज्यात पावसाचा हाहाकार

■ मुंबई

**सलग** चौथ्या दिवशी पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे मुंबईतील दादर, हिंदमाता, सायन, कुर्ला, अंधेरी, मालाड, जोगेश्वरी, वांद्रे, भांडूप, माटुंगा, विलेपार्ले आणि जुहू परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. काही तासांच्या पावसातच अनेक रस्त्यांना नदीचे स्वरूप आले. लोकल सेवा उशिराने धावू लागली, तर रस्ते वाहतुकीचाही वेग मंदावला. दादरच्या मीनाताई ठाकरे फुल मार्केटमध्ये मध्यरात्री भलेमोठे वडाचे झाड कोसळून अनेक दुकानांचे नुकसान झाले. सुदैवाने मध्यरात्रीची वेळ असल्याने मोठी जीवितहानी टळली. माटुंगामध्ये झाड कोसळून दोन वाहनांचे नुकसान झाले. चेंबुरमध्ये सी.जी गिरवाई रोडवर पुन्हा झाड कोसळले. सुदैवाने जीवितहानी नाही. पवईच्या हिरानंदानी परिसरातही मोठे झाड कोसळले. ठाण्यातील खारेगाव परिसरात झाड कोसळून दोन दुचाकीस्वार जखमी झाले. नौपाडा भागात झाड कोसळले. नाशिकमध्ये कॉलेज रोड परिसरात हॉटेलवर झाड कोसळल्याने मालकाचे आर्थिक नुकसान झाले. साताऱ्यात जिल्हा परिषद अध्यक्षांच्या घरासमोरही झाड कोसळले.

मुंबईत भांडूपच्या एलबीएस रोडलगत बांधकाम सुरू असलेल्या जागेजवळील रस्ता अचानक खचला. त्यासोबतच निर्माणाधीन सुरक्षा भिंत कोसळली आणि शेजारी उभा असलेला टेम्पो थेट खड्ड्यात पडला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. दुसरीकडे, भांडूपच्या व्हिलेज रोड परिसरात तीन ते चार फूट पाणी साचल्याने अनेक नागरिक अडकले. स्थानिकांनी दोरीच्या सहाय्याने त्यांना सुरक्षित बाहेर काढत मदतकार्य केले. » पान ८ वर




**जून महिना जवळपास कोरडा गेल्यानंतर जुलैच्या पहिल्याच आठवड्यात पावसाने राज्यात हाहाकार केला. मुंबई, ठाणे, पालघर, वसई-विरार, भिवंडीसह अनेक भागांत मुसळधार पावसामुळे झाडे कोसळणे, रस्ते खचणे, सखल भागांत पाणी तुंबण्याच्या घटना घडल्या. अनेक ठिकाणी घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्याने आर्थिक नुकसान झाले, नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने मुंबई आणि ठाणे जिल्ह्यासह काही भागांसाठी रेड अलर्ट जारी केला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे.**

### ७० मिमीहून अधिक पावसाची नोंद! रेड अलर्ट कायम

संततधार पावसामुळे गेल्या काही तासांत ७० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली. भारतीय हवामान विभागाने मुंबई, ठाणे, पालघर, रायगडसह अनेक जिल्ह्यांसाठी रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला असून, पुढील काही तासांतही अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मुंबईत दुपारपर्यंत विक्रोळी - १६४.० मिमी, राम मंदिर - १४८.५ मिमी, सांताक्रूझ -१२६.९ मिमी, विद्याविहार - १०२.० मिमी, वांद्रे -७२.५ मिमी, सायन - ६३.५ मिमी, कुलाबा -५३.४ मिमी, भायखळा -३४.५ मिमी पावसाची नोंद झाली.

## एकनाथ शिंदे आजारी
## ठाण्यातील रुग्णालयात उपचार

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ताप आणि अशक्तपणा जाणवू लागल्याने त्यांना ठाण्यातील ज्युपिटर या खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचे नियोजित शासकीय आणि राजकीय कार्यक्रम तात्पुरते रद्द करण्यात आले आहेत.**

■ ठाणे



**काल** विधिमंडळाचे कामकाज सुरू असतानाच शिंदे यांना ताप आला होता. प्रकृती ठीक नसतानाही त्यांनी दिवसभराचे काम सुरू ठेवले. मात्र, रात्री उशिरा त्रास वाढल्याने त्यांना » पान २ वर

### फोडफोडीचा थकवा

एकनाथ शिंदे हे गेले काही महिने फोडाफोडीच्या राजकारणात मश्गूल होते. त्यातच त्यांना सतत दिल्ली दौरे करावे लागत होते. खासदारांना फोडल्यावर ऑपरेशन टायगर २ सुरू केले. सचिन अहिरसह काही आमदारांना गटात घेतले गेले. त्यातच ठाण्याचा विकास आणि महाबळेश्वर क्षेत्रात चौथी मुंबई उभारण्याबाबत सतत बैठका घ्याव्या लागत होत्या. त्याचा विपरित परिणाम शेवटी त्यांच्या आरोग्यावर झाला. विशेष म्हणजे ठाणे हा त्यांचा बालेकिल्ला गेले अनेक वर्षे असूनही जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था ते सुधारू शकले नाहीत. ठाण्यातील सरकारी व पालिका रुग्णालयांची स्थिती दयनीय असल्याने ते स्वत: आजारी पडल्यावर त्यांना ज्युपिटरसारख्या अत्यंत महागड्या रुग्णालयात भरती व्हावे लागले. सामान्यांना हे रुग्णालय परवडत नाही, पण फोडाफोडीची ताकद ज्यांना पुरवली जाते त्यांच्यासाठी हा खर्च किरकोळ आहे.

## जैन विद्यार्थ्यांसाठी ७ वसतिगृहे
## राज्य जैन विकास आयोगाची मंजुरी

**मुंबई** - राज्यात जैन समाजातील विद्यार्थ्यांसाठी सात वसतिगृहे उभारण्यास, तसेच स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या जैन समाजातील महिलांना बिनव्याजी कर्ज देण्यास राज्य जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाने (जेएमडीएफसी) नुकतीच मंजुरी दिली.

जेएमडीएफसीचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच मुंबईत संचालक मंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत या निर्णयांना मंजुरी देण्यात आली. राज्य सरकारने जैन समाजातील मुला-मुलींच्या शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या उद्देशाने जेएमडीएफसीची स्थापना केली आहे. सरकारच्या या धोरणानुसार जैन समाजातील

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई, पुणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर या शहरांमध्ये ही वसतिगृहे बांधण्याचा » पान २ वर






### २० जुलै ते १३ ऑगस्टपर्यंत संसदेचे पावसाळी अधिवेशन

**नवी दिल्ली** - संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होणार असून, ते १३ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. हे अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकरण, केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी, अयोध्येतील राम मंदिरातील देणगी चोरीचा वाद, तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद आणि ग्रेट निकोबार प्रकल्प यांसारख्या मुद्द्यांवर विरोधक सरकारला घेरण्याची शक्यता आहे.

## वांगचुक यांना काही
## झाल्यास सरकार जबाबदार

■ नवी दिल्ली

**नीट परीक्षा** व्यवस्थेतील गैरप्रकार, पेपरफुटी, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा आणि धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा या मागणीसाठी जंतरमंतर येथे सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाचा आज १५ वा दिवस होता. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पर्यावरण कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा सातवा दिवस असून, त्यांची प्रकृती झपाट्याने खालावत आहे. या पार्श्वभूमीवर सीजेपीचा संस्थापक अभिजित दीपके याने सरकारवर निशाणा साधत, वांगचुक यांना काही

### दीपके याचा इशारा

झाल्यास त्याला केंद्र सरकार जबाबदार असेल, असा इशारा दिला.

अभिजित दीपके याने सांगितले की, सात दिवसांच्या उपोषणादरम्यान वांगचुक यांचे तब्बल पाच किलो वजन घटले असून, त्यांची प्रकृती दिवसेंदिवस » पान २ वर

## मृत्यूवर हसणाऱ्यांना पाठीशी का घालता?
## राज ठाकरेंचे देवेंद्र फडणवीसांना पत्र

■ मुंबई

**मुंबईतील** साकीनाका येथे उघड्या मॅनहोलमध्ये पडून अस्लम शेख यांचा मृत्यू झाल्याच्या घटनेवरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या घटनेवर भाजपाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी विधान भवनाच्या आवारात हसत हसत केलेल्या टिप्पणीवरून टीका होत आहे. उबाठा खासदार संजय राऊत यांनी भाजपाला 'मौत के सौदागर' 'मुंबई बीजेपी का क्रूर चेहरा' असे म्हणत अमित साटम यांचा हसतानाचा फोटो पोस्ट केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावरूनच



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खरमरीत पत्र लिहिले आहे. मृत्यूवर हसणाऱ्यांना पाठीशी का घालता? तुमच्या मौनाचे नेमके कारण काय आहे? असा सवाल केला आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या पत्रातून भाजपा नेत्यांच्या वागणुकीवर आणि देवेंद्र फडणवीस यांच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राज ठाकरे म्हणाले की, भाजपाच्या केंद्रातील लोकांना सत्तेचा माज आला आहे, हे पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण भारतातील लोक सर्रास बोलत आहेत. केंद्रातील लोक वाट्टेल तसे वागत आहेत याचा राग लोकांच्या मनात होता आणि आहेच. पण हा संसर्ग आता आपल्या राज्यापर्यंत पसरला आहे? आणि » पान २ वर

## मिसिंग लिंकवर खड्डे पडले
## दुसरी लेअर येईल! फडणवीस

■ मुंबई

**मुंबई-पुणे** द्रुतगती मार्गावरील महत्त्वाकांक्षी मिसिंग लिंक प्रकल्पाचे उद्घाटन होऊन अवघे दोन महिने उलटले असतानाच या मार्गावरील कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. १ मे रोजी महायुती सरकारने मोठ्या थाटात या प्रकल्पाचे उद्घाटन करून तो वाहतुकीसाठी खुला केला होता. मात्र पहिल्याच पावसानंतर या मार्गावरील कनेक्टरजवळ दोन मोठे खड्डे पडल्याने विरोधकांनी सरकारवर टीका केली आहे. या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मिसिंग लिंकवर केवळ कनेक्टरजवळ दोन खड्डे पडले आहेत. पहिल्या पावसानंतर दुसरी लेअर येते असे स्पष्टीकरण दिले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मिसिंग लिंकवर खड्डे पडले आहेत, कनेक्टरजवळ दोन खड्डे पडले आहेत, बाकी कुठेही खड्डे नाहीत. कोणतेही मोठे पायाभूत काम पूर्ण झाल्यानंतर पहिल्या पावसात त्याची चाचणी होते. पहिल्या पावसानंतर दुसरी लेअर येते.

## उज्जैन महाकाल ते अयोध्या राममंदिर
## २ ऑक्टोबरपासून काँग्रेसची पदयात्रा

■ उज्जैन

**अयोध्यातील** राममंदिरातील देणग्यांचा अपहार झाल्याच्या निषेधार्थ मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे खासदार दिग्विजय सिंह यांनी २ ऑक्टोबरपासून उज्जैन येथील महाकाल मंदिरापासून अयोध्येतील राम मंदिरापर्यंत सुमारे १,००० कि.मीची पदयात्रा काढण्याची घोषणा केली आहे. तसेच पदयात्रा अयोध्येला पोहोचल्यानंतर अयोध्या जिल्हा न्यायालयात या आर्थिक घोटाळा प्रकरणी दावा दाखल करण्यात येणार आहे.




दिग्विजय सिंह यांनी त्यांच्या निवासस्थानाबाहेर देणगी चोरणाऱ्यांना माझ्या घरात प्रवेश नाही, असा फलक लावला आहे. त्यांनी म्हटले आहे की, धार्मिक देणग्यांच्या हाताळणीत पारदर्शकता असावी. भाविकांना त्यांच्या देणग्यांचा वापर कसा केला जातो, हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. ही पदयात्रा राजकीय नसून धार्मिक देणग्यांच्या पारदर्शकतेसाठी आहे. देणग्यांचा गैरवापर झाला असे वाटणाऱ्या सर्वांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे, भाविकांनी » पान २ वर

## लवकरच महाभूकंप होणार
## संजय शिरसाट यांचा दावा

■ छत्रपती संभाजीनगर

**फोडाफोडीच्या** राजकारणावर कडवी टीका होत असतानाही शिंदेसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी आज पत्रकार परिषदेमध्ये दावा केला की, 'ऑपरेशन ३.०' सुरू झाले आहे. लवकरच एक 'महाभूकंप' होणार आहे. तसेच, उद्धव ठाकरे यांच्या घंटानाद आंदोलनावर आणि संजय राऊत यांच्या टीकेवरही त्यांनी प्रत्युत्तर दिले.

संजय शिरसाट म्हणाले की, दरवेळेला कुणी पक्ष सोडून गेला की, संजय राऊत त्याला वेश्या, गद्दार म्हणतात किंवा त्याचा लिलाव झाल्याचा आरोप करतात. स्वतःचे अपयश लपवण्यासाठी ते असे आरोप करत आहेत. माणसं घरातून फुटतातच का, याचा विचार त्यांनी केला पाहिजे. आमचे 'ऑपरेशन ३.०' सुरू झाले आहे. आम्ही सध्या सॅम्पल चेक करत आहोत. काही दिवसांतच तुम्हाला त्याचे परिणाम पाहायला मिळतील. राज्यात महाभूकंप होणार आहे. हे ऑपरेशन कधी करायचे आणि किती लोकांचे करायचे, याचा आकडा आणि निर्णय स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठरवतील.

राम मंदिरातील चोरीच्या घटनेवरून उद्धव ठाकरे यांनी राज्यभरात 'घंटानाद' आणि 'रामरक्षा आंदोलन' पुकारले आहे. यावर बोलताना शिरसाट » पान २ वर

## राम मंदिरनंतर बद्रीनाथ मंदिरात चोरी
## मंदिर समितीकडून चौकशी समितीची स्थापना

■ लखनौ

**अयोध्येतील** राममंदिर दानाच्या चोरीची चौकशी सुरू असतानाच बद्रीनाथ मंदिरात दान चोरीचा आरोप झाला आहे. बद्रीनाथ व केदारनाथ मंदिर समितीने म्हणजे बीकेटीसीने बद्रीनाथ धामातील देणग्या आणि अर्पणांच्या अपहाराच्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश दिले. सोशल मीडियावर या संदर्भातील आरोप व्हायरल झाल्यानंतर समितीने हा निर्णय घेतला आहे.

बीकेटीसीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, देहरादूनस्थित भैरव सेना या संघटनेने बद्रीनाथ धामातील एका कर्मचाऱ्यावर देणगीची रक्कम आणि अर्पणे हडप



केल्याचा आरोप केला आहे. मात्र, या आरोपांसोबत कोणताही ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही. तरीही प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. अधिकाऱ्याने सांगितले की, देणगी मोजणीची जबाबदारी असलेल्या कर्मचाऱ्यांकडूनही स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. बीकेटीसीचे अध्यक्ष हेमंत द्विवेदी म्हणाले की, बीकेटीसीने या आरोपांची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली आहे. कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धा आणि भावनांशी संबंधित हे अतिशय संवेदनशील प्रकरण असल्याने आरोपांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशीचा अहवाल सार्वजनिक करण्यात येईल. आरोप सिद्ध झाल्यास संबंधित दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.

## रत्नागिरी विमानतळाच्या
## विकासाला गती मिळणार

■ रत्नागिरी

### आज सामंजस्य करार

**रत्नागिरीतील** विमानतळाच्या विकासाला गती देण्यासाठी भारतीय तटरक्षक दल आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्यात उद्या रविवार ५ जुलै रोजी सामंजस्य करार होणार आहे. १०० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पातून ७२ आसनी विमाने चालवण्याचे नियोजन असून, मुंबईसाठी विमानसेवा वर्षाअखेरीस सुरू होण्याची शक्यता आहे. हा सामंजस्य करार कार्यक्रम पालकमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या रविवारी सकाळी ११ वाजता रत्नागिरीतील टीआरपी परिसरातील हॉटेल सावंत पॅलेस येथे होणार आहे. यावेळी गृहराज्यमंत्री योगेश कदम, जिल्हा परिषद अध्यक्ष अस्मिता केंद्रे, खासदार नारायण राणे, सुनील तटकरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, निरंजन डावखरे, अनिकेत तटकरे, प्रमोद जठार, शेखर निकम, भास्कर जाधव, किरण सामंत उपस्थित राहणार आहेत.

## पाळीव श्वानाला श्रीकृष्णासारखी
## वेशभूषा करणे गुन्हा ठरत नाही

### पंजाब हायकोर्टाचा निर्वाळा

**पाळीव श्वानाला भगवान श्रीकृष्णासारखी वेशभूषा करणे हा गुन्हा ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान दिला.**




■ अमृतसर

**एका** महिलेने कृष्ण जन्माष्टमीनिमित्त आपल्या पाळीव श्वानाला भगवान श्रीकृष्णासारखी वेशभूषा करून त्याचे छायाचित्र व्हॉट्सअ‍ॅपवर शेअर केले होते. त्यावर आक्षेप घेत एका व्यक्तीने संबंधित महिलेविरुद्ध धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, (बीएनएस) कलम २९८ अन्वये गुन्हा दाखल केला होता.

संबंधित महिलेने हा गुन्हा रद्द करण्याच्या मागणीसाठी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. कोणाच्याही भावना दुखावण्याचा आपला हेतू नव्हता. केवळ भगवान श्रीकृष्णावरील निस्सीम श्रद्धेपोटी आपल्या हातून ही कृती घडली, असा युक्तिवाद महिलेच्या वतीने करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासात असे आढळून आले होते की, संबंधित महिलेला मूल-बाळ नाही. त्यामुळे ती आपल्या पाळीव श्वानावर मुलासारखे प्रेम करते. या याचिकेवर न्या. सुभाष मेहला यांच्या न्यायासनासमोर सुनावणी झाली.

# जाहिराती
**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, पेशंटकेअर, (Male+ Female) पाहिजेत (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC261061}

ड्रायव्हर्स पाहिजेत. अनुभवी, टी आर लाईसेंस आवश्यक. पगार 18000 ते 21000. संपर्कः **9920925129** {NC261132}

लोन रिकवरी करण्यासाठी ठाणेयेथे मुले, मुली, स्त्री, पुरुष पाहिजेत. **9326370962** {NC261084}

**पाहिजेत**
मुंबईतील एका अग्रगण्य सहकारी बँकेला अल्प कालावधीकरीता **ट्रेनी स्टुडंटस्ची** आवश्यकता आहे.
शैक्षणिक अर्हता : १२ वी पास (वाणिज्य शाखा)
५०% पेक्षा जास्त गुणांनी प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण. वय : १८ ते २३ वर्षांपर्यंत
अर्ज सादर करण्याची पध्दती: १. अर्ज आणि परिचय पत्र (Resume) सादर करणे. २. वैयक्तिक मुलाखत
आवश्यक कागदपत्रे: १.ओळख व पत्त्याचा पुरावा. २. शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे. ३. सध्या शिकत असलेल्या महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट, मराठी व इंग्रजी भाषा लिहिता, वाचता येणे आवश्यक, संगणक वापरण्याचे ज्ञान आवश्यक (MS Word, Excel).
जाहिरातीत नमूद केलेल्या पात्रतेबाबतच्या निकषांची पूर्तता करणाऱ्या व ट्रेनी स्टुडंटस् म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांनी दिनांक १४.०७.२०२६ पर्यंत खालील पोस्ट बॉक्स क्रमांकावर परिचय पत्र व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा.
**पोस्ट बॉक्स क्रमांक १०२७**
**जी.पी.ओ. मुंबई-४०० ००१.**

दादर पश्चिम येथे पार्ट टाईम ड्रायव्हर पाहिजे. संध्याकाळी 6 ते 8 किंवा सकाळी 10 ते 12 संपर्क- **9892458244.** {NC261120}

मेटरनिटी हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या नर्सेसना सुवर्णसंधी संपर्क करा. - **8452090784** {NC261153}

Urgent बाहेरील कामासाठी मुले पाहिजेत. विरार ते भाईंदर परिसरातील राहणाऱ्यांना प्राधान्य. **9833911797** {NC261094}

मालाड वेस्टमध्ये इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुली पाहिजे संपर्क- **9819123920.** {NC261159}

## शैक्षणिक

पाटील अँड शेख अकॅडमी SSC, HSC, BA, B.COM., B.SC उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहींणीसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/ आर्किटेक्टरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच १५ जुलै २०२६ पासून सकाळी आणि संध्याकाळी सुरू होणार आहे. प्रवेश सुरू झाले- **9757312624/ 9757099923** {NC261083}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC261156}

## जागा विकणे आहे

नागाव Village, अलिबाग येथे बीचपासून ८५० मी जवळ २ ते २.७५ गुंठे प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध आहेत. संपर्क- सागर म्हात्रे- **9167423708.** {NC261158}

## विवाहविषयक

लग्नाकरिता गरीब मुला मुलींची मोफत नावे नोंदणी. लावण्या- **7045943167** कविता- **7977883961** {NC261121}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर सर्व जाती, WEB, मुलींना. FREE- **9869868620** {NC261139}

## वधु पाहिजे

विवाह ४२ वर्षाच्या अविवाहित ख्रिश्चन मुलाकरिता अनुरूप वधू पाहिजे **9870229915** {NC261157}

## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

# पायरसी चित्रपट, ओटीटीवरील मजकूर हटवण्याचे केंद्राचे टेलिग्रामला निर्देश

■ नवी दिल्ली

**पायरसी** केलेले चित्रपट, वेब सिरीज आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवरील कॉपीराईट असलेला मजकूर मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत असल्याच्या आरोपांवरून केंद्र सरकारने मेसेजिंग प्लॅटफॉर्म टेलिग्रामला नोटीस बजावली असून, असे चित्रपट, मजकूर तत्काळ हटवण्याचे निर्देश दिले आहेत.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने टेलिग्रामला पाठवलेल्या नोटिशीत कॉपीराईट कायद्यान्वये सुरक्षित असलेला चित्रपट, वेब सिरीज आणि अन्य सामग्री बेकायदेशीरपणे शेअर करणाऱ्या चॅनेल्स आणि गटांवर त्वरित कारवाई करण्यास सांगितले आहे. ऑनलाईन पायरसीमुळे भारतीय मनोरंजन उद्योगाला मोठे नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे.

पायरसीचा मजकूर रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना तसेच कॉपीराईट उल्लंघनासाठी प्लॅटफॉर्मचा गैरवापर होऊ नये यासाठी यंत्रणा अधिक सक्षम बनवा, असेही नोटिशीत म्हटले आहे. यासोबतच, मंत्रालयाच्या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी उचललेल्या पावलांचा सविस्तर अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करण्यासही सांगण्यात आले आहे.

# वसई-विरार जलमय! जनजीवन विस्कळीत

■ वसई

**वसई-विरार** शहरात पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे शहर जलमय झाले असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. मागील पाच दिवसांपासून वसईत पावसाची संसतधार सुरू आहे. संपूर्ण शहरात पूरस्थितीजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वाधिक नालासोपारामधील तुळींज, सेंट्रल पार्क, आचोळे, रेल्वे स्थानक आणि पश्चिमेकडील बस स्थानक परिसर पाण्याखाली गेला आहे. यामुळे रिक्षा सेवा ठप्प झाली आहे.

विरार पश्चिमेकडील बोळींज, ग्लोबल सिटी, पुष्पा नगर, विवा महाविद्यालय परिसर, पालिका मुख्यालय भागात पाणी साचले आहे. वसई पूर्वेच्या भागातील सातीवली, रेंज नाका, भोयदापाडा, गोखीवरे परिसर आणि एव्हरशाईन पश्चिमेकडील देवतलाव, गिरीज, बंगली, चुळणा आदी भागात पाणी साचले आहे. नायगावचाही अनेक भाग पावसामुळे जलमय झाला आहे.

## महापौरांकडून आढावा

महानगरपालिकेचे महापौर अजीव पाटील यांनी आज स्वतः विरार पूर्व आणि पश्चिम परिसरात उतरून साचलेल्या पाण्याचा आणि उद्भवलेल्या समस्यांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. शहरात रस्त्यांच्या दोन्ही बाजूला मोठी गटारे असूनही, पाऊस आणि वैतरणा खाडीच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास नैसर्गिक अडथळा निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

खासगी कार्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेल्याने पायी चालणेही अत्यंत धोकादायक बनले आहे. महावितरणाच्या विजेचा खेळखंडोबा सुरू असून अनेक भागांतील वीज खंडीत झालेली आहे.

नालासोपाऱ्याच्या अनेक भागांत कमरेएवढे पाणी गेले असून, तळमजल्यावरील घरात, चाळीत पाणी शिरले आहे. रिक्षा वाहतूक बंद झाल्याने घरी परतणाऱ्या लोकांचे हाल होत आहेत. दुचाकी आणि चारचाकी वाहने पाण्यात बंद पडत आहेत. विरारमध्ये पाण्यातून वाट काढण्यासाठी ट्रॅक्टरचा वापर सुरू करण्यात आला आहे.

शहरात कुठेही पाणी साचल्यास किंवा आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन पालिकेने केले आहे. यासाठी १८००२३३४३५३ आणि १८००२६७३८९८ हे टोल फ्री क्रमांक जाहीर करण्यात आहे आहेत.

# पुण्यात फरार गुंडाच्या हॉटेलवर पोलिसांनी बुलडोझर चालवला



■ पुणे

**पुण्यातील** वडगाव बुद्रुक भागातील सिंहगड महाविद्यालयाच्या परिसरात दहशत माजविणारा गुंड मनोज पाडुळे याने बांधलेल्या बेकायदा हॉटेलवर पोलिसांनी बुलडोझर चालवून ते जमीनदोस्त केले.

मनोज पाडुळे आणि त्याच्या साथीदारांवर भारती विद्यापीठ पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये गुन्हा दाखल केला होता. तेव्हापासून तो फरार झाला आहे. त्याच्या टोळीला आर्थिक बळ पुरविण्यासाठी सिंहगड कॅम्पस येथील बेकायदा 'मातोश्री हॉटेल'चा वापर होत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यानंतर महसूल विभाग व संबंधित यंत्रणांच्या मदतीने बुलडोझरच्या सहाय्याने ही कारवाई करण्यात आली. सिंहगड कॅम्पस परिसरातील हे हॉटेल अनेक वर्षांपासून गुन्हेगारी कारवायांचे केंद्र बनले होते. टोळीचे सदस्य येथे नियमितपणे एकत्र येत होते. परिसरात दहशत निर्माण करणे, गुन्हेगारी कारवायांचे नियोजन करणे. तसेच टोळीच्या हालचालींसाठी या ठिकाणाचा वापर केला जात असल्याचे तपासात समोर आले आहे. वारंवार घडणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.

मनोज पाडुळे याच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी, मारहाण यासह गंभीर स्वरूपाचे सुमारे १५ गुन्हे दाखल आहेत.

# भोंदूबाबा मनोहरमामावर सहावा गुन्हा पूजेच्या बहाण्याने अत्याचाराचा आरोप

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील वादग्रस्त भोंदूबाबा मनोहरमामा भोसले याच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्याच्या विरोधात करमाळा पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मनोहरमामा भोसले याच्या विरोधात लैंगिक अत्याचार, फसवणूक आणि इतर संबंधित कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे. यामुळे त्याच्या विरोधातील गुन्ह्यांची संख्या आता सहावर पोहोचली आहे.

तक्रारीनुसार, आरोग्याशी संबंधित समस्या दूर करण्याचे आणि आजारपण बरे करण्याचे आश्वासन देत मनोहरमामाने संबंधित महिलेची फसवणूक केली. तीन अमावास्यांना विशेष पूजा केल्यास समस्या दूर होतील, असे सांगून त्याने महिलेकडून मोठी रक्कम घेतल्याचा आरोप आहे. याच पूजेच्या नावाखाली मनोहरमामाने पीडित महिलेसोबत अश्लील कृत्य केल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. महिलेच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी मनोहरमामा भोसले याच्या विविध आश्रमांवर छापेमारी केली. मनोहरमामाच्या विविध बँकांमधील २० हून अधिक खात्यांचीही चौकशी करण्यात आली.

# सहकार हीच सामान्य माणसाची ताकद! फडणवीसांचे वक्तव्य

» पान ८ वरून

शोभा सावंत, विनय कोरे (वारणा समूह) विद्याधर अनास्कर (महाराष्ट्र राज्य सहकारी बँक), शिवाजीराव नलावडे, शहाजी पाटील, सिद्धार्थ कांबळे, नामदेव शेंडी, राजेंद्र सरकाळे, सचिन पारवेकर, विजय काळे, चंद्रकांत पाटील, अशोक जगताप, विजय (विजी) पवार, अलादीन वसईकर, दशरथ घनवट, रोहित निकम यांचा गौरव करण्यात आला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने सव्वाशे वर्षांपूर्वी सहकाराची ताकद ओळखून बँकिंग, कृषी, साखर, दुग्धव्यवसाय, गृहनिर्माण आदी क्षेत्रांत भक्कम सहकार चळवळ उभी केली. आज राज्यात दोन लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असून, देशातील सर्वात मजबूत सहकार व्यवस्था महाराष्ट्रात आहे. केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन करून सहकार क्षेत्राला नवी दिशा दिल्याचे सांगत त्यांनी डिजिटायझेशन, नवीन पॅक्स, राष्ट्रीय सहकार धोरण आणि विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे काम सुरू केले. सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी स्वयंपुनर्विकासाला प्रोत्साहन, शिक्षण निधी पुन्हा सुरू करण्याची घोषणा आणि सहकार क्षेत्राच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येणार आहे.

# जैन विद्यार्थ्यांसाठी ७ वसतिगृहे
## राज्य जैन विकास आयोगाची मंजुरी

» पान १ वरून

निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयाला जेएमडीएफसीच्या बैठकीत आता मंजुरी मिळाल्याने या कामाला गती येणार आहे.

जैन समाजातील मुली आणि महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी आणि कुटिरोद्योगाला चालना देण्यासाठी १० हजार ते १ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी देण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक महिलांकडून पुढील पंधरा दिवसांत अर्ज प्राप्त होणे अपेक्षित आहे.

या बैठकीत विहारधाम विकास योजना, पाठशाला नूतनीकरण आणि सक्षमीकरण योजना आणि मराठी -जैन साहित्य एनसायक्लोपिडियाचे कालबद्ध संकलन करण्यासही मंजुरी देण्यात आली.

# मृत्यूवर हसणाऱ्यांना पाठीशी का घालता? राज ठाकरेंचे देवेंद्र फडणवीसांना पत्र

» पान १ वरून

तुम्ही तू पसरू देता? तुमचा एक आमदार आणि पदाधिकारी लोकांच्या मृत्यूवर फिदीफिदी हसतो आणि त्यावर कारवाईचा एकही आसूड ओढला जात नाही. कोणाला कशाचाच खेद नाही, खंत नाही अशी परिस्थिती आहे. या सगळ्यात तुम्ही एकही अवाक्षर बोलत नाही. यामुळे सगळे बेफाम झाले आहेत. सत्ता माणसाला भ्रष्ट करण्याकडे झुकते आणि अमर्यादीत सत्ता त्याला संपूर्णपणे भ्रष्ट करते. या वाक्याचा अर्थ उद्या समजून सांगायची वेळ आली तर सध्याचे भाजपाचे तुमचे सहकारी हे आदर्श उदाहरण ठरतील अशी परिस्थिती आहे.

पुढे राज ठाकरे यांनी लिहिले आहे की, महाराष्ट्रात यापूर्वी कोणत्याही पक्षाच्या नेत्याने चूक केल्यास त्याला पाठीशी घालण्याची परंपरा नव्हती. बाळासाहेब ठाकरे, शरद पवार आणि प्रमोद महाजन यांसारख्या नेत्यांच्या काळात राजकीय शिष्टाचार जपले जात होते.

आज तुम्ही हा आपला आहे ना मग त्यांनी काहीही केले तरी घाल त्याला पाठीशी सुरू केले आहे. याने तुम्ही तुमची आणि महाराष्ट्राची प्रतिमा डागाळत आहात असे वाटत नाही का? तुमचे मंत्री रोज बेताल विधान करत आहेत, त्याबद्दल तुम्ही काही बोलत नाही. तुमचे इतर नेते असंवेदनशीलता उघडपणे दात दाखवतात त्यांना तुम्ही काही बोलत नाही. बोलला असता तर परत त्यांची तीच चूक करायची हिम्मत झाली नसती. पण ते तसेच वागत आहेत. यावरून समजते की, तुम्ही त्यांना काहीच समज देत नाही आहात. तुमच्या मौनाचे नेमके कारण काय आहे?

# एकनाथ शिंदे आजारी ठाण्यातील रुग्णालयात उपचार

» पान १ वरून

तातडीने ठाण्यातील खासगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना काही दिवस संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे पुढील काही दिवसांचे सर्व शासकीय दौरे, बैठका आणि राजकीय कार्यक्रम तात्पुरते रद्द करण्यात आले आहेत. त्यांच्या अनुपस्थितीमुळे काही कार्यक्रम पुढे ढकलले असून, नव्या तारखा लवकरच जाहीर केल्या जाण्याची शक्यता आहे.




# २ ऑक्टोबरपासून काँग्रेसची पदयात्रा

» पान १ वरून

प्रभू रामांच्या नावाने पूर्ण श्रद्धेने देणग्या दिल्या आहेत. त्या निधीचा गैरवापर झाला असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. न्यायालयाने आर्थिक अनियमितता झाल्याचे सिद्ध केल्यास मी स्वतः दिलेली देणगी परत मागून ती इतर एखाद्या मान्यताप्राप्त धार्मिक संस्थेला किंवा शंकराचार्य ट्रस्टला देईन असेही त्यांनी स्पष्ट केले. दिग्विजय सिंह यांनी घोषित केलेल्या पदयात्रेत दररोज १० ते १५ किलोमीटर चालण्याचा त्यांचा मानस आहे. दरम्यान, आरजेडी खासदार सुधाकर सिंह यांनी काल सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. त्यांनी देणगी चोरीच्या सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. काल विशेष तपास पथकाने अनिल मिश्रा यांची सुमारे ३ तास सतत चौकशी केली. प्रभारी गोपाल राव यांनाही प्रश्न विचारण्यात आले. दोघांकडून मालमत्तेशी संबंधित सर्व कागदपत्रे मागवण्यात आली आहेत. दोघांच्या बँक स्टेटमेंटचीही तपासणी केली जाईल. याशिवाय, मंदिर ट्रस्टकडून ५ वर्षांचे ऑडिटही मागवण्यात आले आहे.

अयोध्या राम मंदिरातील दान घोटाळा प्रकरणावर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवर आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांनी कोणतीही थेट प्रतिक्रिया दिली नाही, तर त्यांनी हात जोडून फक्त राम-राम असे दोनच शब्द उच्चारले आणि पुढे निघून गेले. आरएसएस सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी अधिकृत प्रतिक्रिया काल देताना या घटनेला अत्यंत दुर्दैवी आणि संपूर्ण हिंदू समाजाच्या श्रद्धेला धक्का पोहोचवणारी म्हटले आहे. तसेच, दोषींवर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे. मंदिर ट्रस्टने ६ जुलैच्या बैठकीची कार्यसूची जाहीर केली आहे. या बैठकीत ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यावर निर्णय घेतला जाईल. एसआयटीचा प्राथमिक अहवाल आणि मंदिर व्यवस्थापनाशी संबंधित व्यवस्थेवरही चर्चा केली जाईल.

अयोध्या दानचोरी प्रकरणाने जनतेच्या मनात रोष निर्माण झाला आहे. अयोध्या राम मंदिर देणगी चोरी प्रकरणात राजीनामा दिलेले विश्वस्त गोपाल राव यांना विमानात पाहून लोक संतापले. त्यांनी 'देणगी चोर' अशा घोषणा द्यायला सुरुवात केली. विमानातील केबिन क्रूने प्रवाशांना समजावले. ही घटना २ जुलैची आहे. मंदिर बांधकाम प्रभारी गोपाल राव सकाळी लखनौच्या अमौसी विमानतळावरून इंडिगोच्या विमानाने बंगळुरूला निघाले होते, तेव्हा ही घटना घडली. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यादरम्यानही मंदिराच्या सजावटीत गडबड झाल्याचे समोर आले आहे. सजावटीचे काम वेगवेगळ्या कंत्राटदारांना देण्यात आले होते, असे सांगितले जात आहे. नंतर अतिरिक्त काम दाखवून कंत्राटदारांना जास्त पैसे दिले गेले. एसआयटीकडून याबाबतही तपास केला जाणार आहे.

# वांगचुक यांना काही झाल्यास सरकार जबाबदार

» पान १ वरून

खालावत आहे. धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणखी किती काळ वाट पाहणार आहेत? २० विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यानंतरही धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवलेले नाही. ते पंतप्रधानांसाठी इतके महत्त्वाचे का आहेत? सरकारने तातडीने कारवाई केली नाही आणि सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीला काही झाले, तर त्याला सरकारच जबाबदार असेल. प्रकृती गंभीर असूनही कारवाई होईपर्यंत ते उपोषण मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, या आंदोलनाला संयुक्त किसान मोर्चा यांनी जाहीर पाठिंबा दिला. एसकेएमचे शिष्टमंडळ उद्या सकाळी ११ वाजता जंतरमंतर येथे आंदोलनस्थळी भेट देणार आहे. हरियाणातील दीनबंधू सर छोटूराम शिक्षा आणि सेवा समितीच्या प्रतिनिधींनीही जंतरमंतर येथे भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला.

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री — प्रभालक्ष्मी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 30/- • सोडत दिनांक 04/07/2026

| बक्षिस | क्रमांक | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SP-07 : 3495 | | | | | | | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी | | | | | | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2368 | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1764 | 2270 | 2599 | 3315 | 3466 | 4268 | 4306 | 5064 | 5242 | 5270 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1275 | 1405 | 1520 | 1641 | 1660 | 4295 | 4300 | 4497 | 4511 | 5460 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1146 | 1256 | 1871 | 2471 | 2953 | 3440 | 3746 | 5480 | 5682 | 5718 |

सहावे बक्षिस रु. 300/- — सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2131 | 2741 | 3307 | 3797 | 4483 | 5221 |
| | | 2192 | 2750 | 3344 | 3814 | 4574 | 5265 |
| 1001 | 1618 | 2249 | 2751 | 3349 | 3823 | 4640 | 5526 |
| 1008 | 1635 | 2407 | 2757 | 3398 | 3900 | 4643 | 5529 |
| 1019 | 1660 | 2480 | 2766 | 3437 | 3926 | 4686 | 5553 |
| 1071 | 1790 | 2517 | 2773 | 3501 | 3953 | 4819 | 5555 |
| 1091 | 1812 | 2577 | 2792 | 3502 | 3963 | 4848 | 5569 |
| 1133 | 1814 | 2602 | 2862 | 3570 | 4032 | 4872 | 5656 |
| 1145 | 1902 | 2626 | 2872 | 3579 | 4246 | 4998 | 5658 |
| 1219 | 1919 | 2630 | 2924 | 3588 | 4250 | 5032 | 5749 |
| 1360 | 1921 | 2656 | 3008 | 3617 | 4285 | 5106 | 5859 |
| 1484 | 2018 | 2690 | 3037 | 3740 | 4464 | 5108 | 5880 |
| 1532 | 2077 | 2691 | 3273 | 3793 | 4482 | 5146 | 5931 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी — सोडत दर शनिवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 27 — सोडत दिनांक 04/07/2026

| बक्षिस | क्रमांक | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | VL-01 : 4977 (हरी श्री लॉटरी सेंटर - नालासोपारा, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत) | | | | | | | | | |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 4977 (लॉटरी भांडार - नागपूर) | | | | | | | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी | | | | | | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 2355 (ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे, विशेष डिस्ट्रिब्युटर - गोरेगाव) | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 6955 (अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक; श्री अष्टविनायक लॉटरी - औरंगाबाद; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (2 बक्षिसे)) | | | | | | | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी | | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 2031 | 2846 | 2948 | 2974 | 4521 | 4823 | 4900 | 5465 | 6833 | 7856 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1241 | 1243 | 1618 | 1732 | 3370 | 4321 | 4942 | 5954 | 7783 | 7817 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2347 | 2850 | 5022 | 5097 | 5833 | 6084 | 6472 | 7275 | 7281 | 7411 |

सातवे बक्षीस रु. 110/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1009 | 1376 | 2029 | 2771 | 3269 | 3769 | 4132 | 4567 | 5305 | 5754 | 6316 | 6622 | 7156 | 7714 |
| 1013 | 1462 | 2038 | 2782 | 3272 | 3770 | 4142 | 4592 | 5314 | 5766 | 6336 | 6633 | 7173 | 7726 |
| 1018 | 1500 | 2085 | 2800 | 3282 | 3777 | 4152 | 4621 | 5322 | 5796 | 6346 | 6655 | 7196 | 7727 |
| 1048 | 1506 | 2092 | 2822 | 3305 | 3828 | 4177 | 4670 | 5357 | 5807 | 6361 | 6659 | 7259 | 7731 |
| 1068 | 1606 | 2110 | 2827 | 3316 | 3833 | 4186 | 4690 | 5385 | 5825 | 6372 | 6663 | 7288 | 7747 |
| 1101 | 1624 | 2142 | 2858 | 3334 | 3835 | 4232 | 4716 | 5457 | 5853 | 6379 | 6669 | 7291 | 7748 |
| 1102 | 1666 | 2193 | 2870 | 3335 | 3844 | 4241 | 4743 | 5478 | 5858 | 6433 | 6695 | 7328 | 7760 |
| 1112 | 1677 | 2236 | 2882 | 3349 | 3854 | 4242 | 4764 | 5479 | 5914 | 6437 | 6696 | 7332 | 7761 |
| 1118 | 1700 | 2252 | 2884 | 3350 | 3858 | 4267 | 4786 | 5485 | 5921 | 6446 | 6699 | 7341 | 7766 |
| 1128 | 1719 | 2259 | 2918 | 3364 | 3873 | 4294 | 4850 | 5491 | 5947 | 6460 | 6720 | 7366 | 7771 |
| 1129 | 1725 | 2272 | 2920 | 3366 | 3879 | 4303 | 4894 | 5526 | 5952 | 6469 | 6724 | 7390 | 7781 |
| 1163 | 1750 | 2321 | 2972 | 3396 | 3897 | 4316 | 4928 | 5551 | 5953 | 6491 | 6856 | 7407 | 7807 |
| 1165 | 1781 | 2327 | 3035 | 3403 | 3931 | 4318 | 4935 | 5558 | 5985 | 6499 | 6864 | 7417 | 7822 |
| 1172 | 1784 | 2386 | 3050 | 3434 | 3933 | 4324 | 4994 | 5564 | 5991 | 6502 | 6909 | 7420 | 7835 |
| 1183 | 1810 | 2528 | 3077 | 3436 | 3934 | 4342 | 4999 | 5585 | 6006 | 6517 | 6914 | 7442 | 7846 |
| 1199 | 1814 | 2561 | 3078 | 3437 | 3937 | 4369 | 5014 | 5587 | 6027 | 6536 | 6920 | 7445 | 7878 |
| 1209 | 1817 | 2573 | 3136 | 3456 | 3980 | 4370 | 5038 | 5594 | 6035 | 6550 | 6952 | 7448 | 7887 |
| 1210 | 1820 | 2578 | 3138 | 3505 | 3984 | 4404 | 5155 | 5618 | 6064 | 6560 | 6957 | 7476 | 7911 |
| 1277 | 1881 | 2612 | 3142 | 3545 | 4032 | 4434 | 5163 | 5622 | 6136 | 6568 | 6969 | 7501 | 7930 |
| 1295 | 1886 | 2636 | 3145 | 3577 | 4034 | 4450 | 5184 | 5642 | 6140 | 6576 | 7006 | 7553 | 7946 |
| 1298 | 1915 | 2670 | 3176 | 3607 | 4040 | 4454 | 5207 | 5653 | 6144 | 6586 | 7027 | 7633 | 7949 |
| 1312 | 1947 | 2684 | 3211 | 3697 | 4041 | 4498 | 5218 | 5658 | 6164 | 6588 | 7057 | 7671 | 7963 |
| 1341 | 1961 | 2714 | 3221 | 3730 | 4050 | 4503 | 5263 | 5701 | 6185 | 6596 | 7073 | 7673 | 7971 |
| 1345 | 1984 | 2717 | 3243 | 3761 | 4055 | 4524 | 5288 | 5745 | 6195 | 6611 | 7077 | 7686 | 7979 |
| 1368 | 2024 | 2721 | 3252 | 3765 | 4084 | 4536 | 5298 | 5753 | 6305 | 6616 | 7104 | 7687 | 7997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 04/07/2026

| बक्षिस | क्रमांक | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-00 : 0132 | | | | | | | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी | | | | | | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 7000/- | 9937 (₹ 7000 ची 5 बक्षिसे = 35,000/- जिंकले; ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे) | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 5000/- | 0464 | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 8232 (₹ 2000 ची 5 बक्षिसे = 10,000/- जिंकले; किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | | | | | | | | | |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1202 | 1291 | 2098 | 2357 | 2462 | 4330 | 4732 | 5747 | 7264 | 9997 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1027 | 2527 | 3058 | 3442 | 3757 | 4786 | 5093 | 5480 | 5496 | 7343 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1415 | 2674 | 3411 | 4123 | 5413 | 6593 | 7387 | 8210 | 8968 |
| | | 1512 | 2732 | 3420 | 4314 | 5425 | 6625 | 7513 | 8288 | 9169 |
| | | 1696 | 2892 | 3438 | 4341 | 5491 | 6645 | 7536 | 8332 | 9230 |
| 0006 | 0501 | 1837 | 3053 | 3532 | 4433 | 5519 | 6652 | 7538 | 8448 | 9244 |
| 0008 | 0520 | 2075 | 3084 | 3548 | 4491 | 5545 | 6658 | 7577 | 8475 | 9312 |
| 0036 | 0640 | 2167 | 3103 | 3581 | 4596 | 5698 | 6669 | 7579 | 8528 | 9406 |
| 0050 | 0850 | 2220 | 3133 | 3649 | 4641 | 5803 | 6693 | 7625 | 8589 | 9448 |
| 0141 | 1050 | 2224 | 3165 | 3689 | 4815 | 5858 | 6713 | 7713 | 8628 | 9627 |
| 0150 | 1109 | 2262 | 3193 | 3699 | 4826 | 5959 | 6749 | 7757 | 8769 | 9743 |
| 0220 | 1112 | 2271 | 3314 | 3721 | 4863 | 6158 | 6916 | 7760 | 8798 | 9794 |
| 0329 | 1179 | 2297 | 3328 | 3808 | 5090 | 6188 | 6924 | 7778 | 8821 | 9823 |
| 0342 | 1209 | 2298 | 3333 | 3916 | 5114 | 6200 | 7003 | 7861 | 8829 | 9865 |
| 0366 | 1245 | 2300 | 3338 | 4004 | 5265 | 6212 | 7033 | 7882 | 8849 | 9941 |
| 0417 | 1332 | 2372 | 3363 | 4005 | 5281 | 6548 | 7090 | 8084 | 8860 | 9964 |
| 0431 | 1345 | 2521 | 3373 | 4008 | 5374 | 6562 | 7211 | 8086 | 8864 | 9967 |
| 0461 | 1376 | 2666 | 3381 | 4026 | 5378 | 6568 | 7355 | 8133 | 8914 | 9983 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 27 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 04/07/2026

| बक्षिस | क्रमांक | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-09 : 2948 | | | | | | | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES | | | | | | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1203 (₹ 5000 ची 5 बक्षिसे = 25,000/- जिंकले; महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी) | | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 4616 | | | | | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1064 | 1119 | 1180 | 1562 | 2553 | 4984 | 5250 | 5289 | 5406 | 5925 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1460 | 1843 | 2488 | 2544 | 3543 | 3650 | 3751 | 5023 | 5031 | 5801 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1121 | 1534 | 2206 | 2672 | 2902 | 3677 | 3945 | 4248 | 4585 | 5350 |
| 1125 | 1553 | 2212 | 2688 | 2912 | 3678 | 3950 | 4267 | 4598 | 5358 |
| 1182 | 1591 | 2240 | 2718 | 2927 | 3759 | 3958 | 4294 | 4774 | 5490 |
| 1183 | 1694 | 2261 | 2736 | 3060 | 3783 | 3973 | 4376 | 4784 | 5509 |
| 1192 | 1844 | 2275 | 2737 | 3313 | 3818 | 4031 | 4442 | 4843 | 5516 |
| 1201 | 1956 | 2423 | 2762 | 3335 | 3848 | 4070 | 4450 | 4847 | 5575 |
| 1236 | 1986 | 2428 | 2824 | 3342 | 3854 | 4074 | 4451 | 4908 | 5695 |
| 1308 | 2062 | 2442 | 2826 | 3381 | 3888 | 4115 | 4477 | 4949 | 5791 |
| 1362 | 2077 | 2608 | 2862 | 3383 | 3890 | 4186 | 4496 | 4969 | 5935 |
| 1372 | 2191 | 2643 | 2900 | 3578 | 3893 | 4238 | 4547 | 5239 | 5968 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# लवकरच महाभूकंप होणार संजय शिरसाट यांचा दावा

» पान १ वरून- म्हणाले की, हिंदुत्व सोडल्यामुळे त्यांच्या या आंदोलनाला कोणताही प्रतिसाद मिळणार नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी आता या आंदोलनात त्यांच्यासोबत नसतील. त्यामुळे त्यांना एकट्यालाच हे पेलावे लागेल. जे लोक घरासमोर हनुमान चालिसा वाचणाऱ्यांना तुरुंगात टाकत होते, त्यांच्यावरच आज गल्लोगल्ली जाऊन हनुमान चालिसा वाचण्याची वेळ आली आहे. राम मंदिरातील चोरी दुर्दैवी असून, त्यात आठ जणांना अटक झाली आहे. या घटनेचे कुणीही समर्थन करणार नाही. साकीनाका मॅनहोल दुर्घटनेवर आमदार अमित साटम हसल्याच्या प्रकरणावर आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रावर शिरसाट म्हणाले की, साटम यांच्या व्हिडिओबाबत मला पूर्ण कल्पना नाही, पण जर तसे घडले असेल, तर मुख्यमंत्र्यांनी त्यांना निश्चित समज दिली असावी. आता हा विषय इथेच संपायला हवा. राज्यात पावसाचे मोठे संकट आहे, त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# गरज नागरिकत्वाच्या सर्वमान्य पुराव्याची



**>>> रविवार विशेष**

***परराष्ट्र मंत्रालयाने पासपोर्ट हा नागरिकत्वाचा अंतिम आणि निर्विवाद पुरावा मानला जाऊ शकत नाही, असे म्हटल्याने देशभरात खळबळ उडाली आहे. वास्तविक, आपण ओळख, निवास आणि नागरिकत्व या तीन वेगवेगळ्या संकल्पनांकडे एकाच नजरेने पाहतो. प्रत्यक्षात या संकल्पना एकमेकांशी संबंधित असल्या तरी त्या समान नाहीत. आधार कार्ड एखाद्या व्यक्तीची ओळख आणि तिचा निवास यांची पुष्टी करते. पासपोर्ट आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी आवश्यक असतो. मतदार ओळखपत्र मतदानाचा अधिकार वापरण्यासाठी पात्रता निर्माण करते. यापैकी कोणतेही दस्तऐवज सर्व उद्देशांसाठी नागरिकत्वाचा अंतिम कायदेशीर पुरावा नाहीत, जरी पासपोर्ट आणि मतदार ओळखपत्र हे केवळ भारतीय नागरिकांनाच दिले जात असले तरीही.***

======================

परराष्ट्र मंत्रालयाने अलीकडेच स्पष्ट केले की, पासपोर्ट हे मुख्यतः आंतरराष्ट्रीय प्रवासासाठीचे दस्तऐवज आहे. ते नागरिकत्वाचा अंतिम आणि निर्विवाद पुरावा मानले जाऊ शकत नाही. या स्पष्टीकरणाने एक जुनी, पण अत्यंत महत्त्वाची चर्चा पुन्हा समोर आणली आहे. भारताला नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी एखाद्या एकमेव आणि सर्वमान्य पुराव्याची गरज आहे का, हा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला आहे. या विधानानंतर अनेक नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले. जर पासपोर्टसुद्धा नागरिकत्वाचा अंतिम पुरावा नसेल, तर मग असा पुरावा नेमका कोणता आहे? आधार कार्ड नागरिकत्व सिद्ध करते का? मतदार ओळखपत्र हा पुरावा आहे का? हा प्रश्न कायमचा मिटवणारे कोणते दस्तऐवज भारतात अस्तित्वात आहेत का? या सर्व प्रश्नांचे थेट उत्तर आहे 'नाही'. भारतात नागरिकत्व सिद्ध करणारे एकमेव आणि सर्वमान्य असे कोणतेही दस्तऐवज कधीच अस्तित्वात नव्हते.

या गोंधळामागील मुख्य कारण म्हणजे आपण ओळख, निवास आणि नागरिकत्व या तीन वेगवेगळ्या संकल्पनांकडे एकाच नजरेने पाहतो. प्रत्यक्षात या संकल्पना एकमेकांशी संबंधित असल्या तरी त्या समान नाहीत. आधार कार्ड एखाद्या व्यक्तीची ओळख आणि तिचा निवास यांची पुष्टी करते. पासपोर्ट आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी आवश्यक असतो. मतदार ओळखपत्र मतदानाचा अधिकार वापरण्यासाठी पात्रता निर्माण करते. यापैकी कोणतेही दस्तऐवज सर्व उद्देशांसाठी नागरिकत्वाचा अंतिम कायदेशीर पुरावा नाहीत, जरी पासपोर्ट आणि मतदार ओळखपत्र हे केवळ भारतीय नागरिकांनाच दिले जात असले तरीही.

भारतीय नागरिकत्वाचा प्रश्न हा नागरिकत्व कायदा, १९५५ नुसार ठरवला जातो. जन्म, वंशपरंपरा, नोंदणी किंवा देशीयीकरण या माध्यमांतून नागरिकत्व प्राप्त होते. व्यवहारात मात्र नागरिकत्व एखाद्या एकमेव प्रमाणपत्राच्या आधारे नव्हे, तर विविध शासकीय नोंदी आणि कागदपत्रांच्या पडताळणीद्वारे निश्चित केले जाते.

जगातील अनेक देश नागरिकांची अधिकृत नोंदणी ठेवतात किंवा नागरिकत्व ओळखपत्र जारी करतात. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतान, श्रीलंका आणि मालदीव यांच्याकडे अशा प्रकारची व्यवस्था आहे. बहुतेक युरोपीय देशांमध्येही नागरिकत्व ओळखपत्र दिले जाते. दुसरीकडे अमेरिका, ब्रिटन आणि कॅनडा यांसारख्या देशांमध्ये जन्म नोंदणी, पासपोर्ट आणि इतर अधिकृत कागदपत्रांच्या आधारे नागरिकत्व सिद्ध केले जाते. भारताची व्यवस्था या दुसऱ्या गटातील देशांसारखी आहे. येथे विविध प्रकारच्या ओळख प्रणाली अस्तित्वात आहेत. मात्र नागरिकत्वाचा एकमेव आणि सर्वमान्य पुरावा उपलब्ध नाही.


आधार कार्डचा अनुभव या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. सन २००९ मध्ये सुरू करण्यात आलेली आधार योजना ही प्रत्येक रहिवाशाला विशिष्ट ओळख क्रमांक देण्यासाठी तयार करण्यात आली होती. सरकारी कल्याणकारी योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे पोहोचवणे आणि लाभार्थ्यांची पुनरावृत्ती टाळणे हा तिचा मुख्य उद्देश होता. त्यामुळेच आधारला सुरुवातीपासूनच नागरिकत्वापासून वेगळे ठेवण्यात आले. त्याची नोंदणी नागरिकत्वाच्या आधारे नव्हे, तर निवासाच्या आधारे करण्यात आली. परिणामी आधार कार्ड नागरिकत्वाचा पुरावा ठरू शकले नाही. अनेकांच्या मते, याच ठिकाणी एक महत्त्वाची संधी गमावली गेली. आधारला दुहेरी उद्देश असलेले दस्तऐवज म्हणून विकसित करता आले असते.

नागरिकत्वावरील वाद सर्वाधिक तीव्रतेने आसाममध्ये समोर आला. राष्ट्रीय नागरिक नोंदणीची प्रक्रिया ही केवळ ओळख पडताळणी नव्हती. ती राज्यातील बेकायदेशीर स्थलांतराच्या इतिहासाशी निगडित नागरिकत्व तपासणीची प्रक्रिया होती. १९८५ च्या आसाम करारानुसार, नागरिकांना किंवा त्यांच्या पूर्वजांना २४ मार्च १९७१ पूर्वी भारतात वास्तव्य असल्याचे पुरावे सादर करणे आवश्यक होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली पार पडलेल्या या प्रक्रियेत हजारो अधिकारी सहभागी झाले. जवळपास १,५०० कोटी रुपये खर्च झाले आणि ही प्रक्रिया पाच वर्षे चालली. तरीही अंतिम निकाल अत्यंत वादग्रस्त ठरला. २०१९ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या अंतिम यादीत सुमारे १९ लाख अर्जदारांची नावे वगळण्यात आली. नागरिक नोंदणीची मागणी करणाऱ्यांच्या मते अनेक बेकायदेशीर स्थलांतरित यादीत समाविष्ट झाले, तर यादीबाहेर राहिलेल्या अनेकांनी आपण खरे भारतीय नागरिक असल्याचा दावा केला. अंतिम यादी आजही अधिकृतपणे अधिसूचित झालेली नाही.

ही प्रक्रिया अडखळली त्यामागील कारण नागरिकत्व सिद्ध करण्यातील गुंतागुंत हेच होते. गरीब, स्थलांतरित, महिलावर्ग, भूमिहीन मजूर आणि पुरामुळे विस्थापित झालेल्या नागरिकांना अनेक दशकांपूर्वीची कागदपत्रे शोधून काढणे कठीण गेले. नावातील बदल, शासकीय नोंदीतील विसंगती किंवा विवाहानंतर बदललेली नावे यामुळे अडचणी आणखी वाढल्या. जेव्हा तीन कोटींपेक्षा जास्त लोकांना अर्धशतक जुने पुरावे सादर करण्यास सांगितले जाते, तेव्हा त्रुटी निर्माण होणे अपरिहार्य ठरते.

पासपोर्ट किंवा मतदार ओळखपत्र बनावट असू शकतात, असा युक्तिवाद अनेकदा केला जातो. परंतु हा युक्तिवाद नागरिक नोंदणी प्रक्रियेत सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रांवर तितक्याच प्रमाणात लागू होतो. बनावट कागदपत्रांचा धोका अधिक सक्षम पडताळणी यंत्रणेची मागणी करतो. कोणत्याही दस्तऐवजाला पूर्णपणे नाकारण्याची नव्हे. आसामचा अनुभव एक मोठा प्रश्न उपस्थित करतो. जर ३.३ कोटी लोकसंख्या असलेल्या एका राज्यात इतक्या अडचणी निर्माण झाल्या, तर १४५ कोटी लोकसंख्या असलेल्या संपूर्ण देशात अशी प्रक्रिया कोणत्याही मोठ्या अडचणीशिवाय राबवणे शक्य होईल का? हा प्रश्न केवळ प्रशासकीय नाही; तो नागरिक आणि राज्य यांच्यातील विश्वासाशी संबंधित आहे.



**एस. वाय. कुरेशी**
माजी मुख्य निवडणूक आयुक्त

नागरिकांना पडताळणीची प्रक्रिया मान्य असते. परंतु त्यांना वारंवार जुनी कागदपत्रे सादर करण्यास सांगितले जाते किंवा विविध शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात, तेव्हा नाराजी निर्माण होते. नागरिकत्वाशी संबंधित कोणत्याही प्रक्रियेचा विरोध तेव्हाच वाढतो, जेव्हा नागरिकांना असे वाटू लागते की, ती प्रक्रिया काही विशिष्ट गटांना लक्ष्य करण्यासाठी वापरली जात आहे. प्रशासनाने नागरिकांना सुविधा द्याव्यात, अडथळे नव्हे.

मग भारताने नागरिकत्वाचा निश्चित पुरावा तयार करण्याची कल्पना सोडून द्यावी का? याचे उत्तर निश्चितपणे नाही असेच आहे. यासाठीचा मार्ग संसदेनं आधीच खुला केला आहे. २००३ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेल्या नागरिकत्व कायद्यात प्रत्येक नागरिकाची अनिवार्य नोंदणी, भारतीय नागरिकांची राष्ट्रीय नोंदवही तयार करणे आणि राष्ट्रीय ओळखपत्र जारी करणे यांची तरतूद करण्यात आली होती. त्यासोबत राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही तयार करणे, त्याची पडताळणी करणे आणि त्याआधारे नागरिक नोंदणी तयार करणे याचाही समावेश होता. कायदेशीर चौकट जवळपास दोन दशकांपासून अस्तित्वात आहे. अभाव आहे तो नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि निष्पक्ष अंमलबजावणीच्या आराखड्याचा आणि तो राबविण्याच्या राजकीय इच्छाशक्तीचा. अशी व्यवस्था दोन मूलभूत आधारांवर उभी राहू शकते. पहिला आधार म्हणजे जन्मनोंदणी. १९६९ च्या कायद्याने जन्मनोंदणी अनिवार्य करण्यात आली असून, भविष्यातील नागरिकत्व नोंदींचा तो पाया ठरू शकतो. ज्यांच्याकडे जन्मप्रमाणपत्र आहे अशा सुमारे ८० कोटी नागरिकांना थेट नागरिकत्व ओळखपत्र देण्याचा विचार केला जाऊ शकतो. जुन्या पिढ्यांसाठी सरकारने मतदार याद्या, पासपोर्ट, शासकीय सेवांच्या नोंदी, कर विवरणपत्रे, निवृत्तीवेतन नोंदी आणि शैक्षणिक प्रमाणपत्रे यांसारख्या विद्यमान कागदपत्रांवर प्रामुख्याने अवलंबून राहावे.

महत्त्वाची बाब म्हणजे नागरिकत्व सिद्ध करण्याचे ओझे वारंवार सामान्य नागरिकांवर टाकले जाऊ नये. एखाद्या व्यक्तीच्या नागरिकत्वाबाबत शंका घेण्याची ठोस कारणे असल्यास ती सिद्ध करण्याची जबाबदारी शासनावर असावी. या प्रक्रियेसाठी पाच किंवा दहा वर्षांचा कालावधी लागला तरी चालेल. परंतु ती विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक असली पाहिजे.

बेकायदेशीर स्थलांतर ही निश्चितच एक गंभीर समस्या आहे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना होणे आवश्यक आहे. मात्र त्या उपाययोजना पुराव्यावर आधारित आणि लक्ष केंद्रित करणाऱ्या असाव्यात. काही संशयित व्यक्तींना शोधण्यासाठी तयार केलेल्या प्रशासकीय जाळ्यात लाखो खरे नागरिक अडकून त्यांना त्रास सहन करावा लागणे योग्य ठरणार नाही.

नागरिकत्व हे व्यक्ती आणि राष्ट्र यांच्यातील सर्वात मूलभूत नाते आहे. राष्ट्राला आपल्या नागरिकांची ओळख निश्चितपणे माहीत असणे आवश्यक आहे. मात्र ही प्रक्रिया भीतीमुक्त असावी. तर त्यातून विश्वास निर्माण होईल. वगळण्याची भावना नसेल तर सहभागाची जाणीव निर्माण होईल आणि नागरिक व राज्य यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ होईल.

●●●

# युरोपातील आक्रिताच्या मुळाशी...



***नेहमीच आपल्या आल्हाददायक आणि थंड हवामानासाठी जगभरातील पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या युरोप खंडाला सध्या हवामान बदलाच्या अत्यंत भीषण आणि अनपेक्षित संकटाने ग्रासले आहे. जून २०२६ च्या सुरुवातीलाच संपूर्ण युरोप खंड एखाद्या कोळशाच्या भट्टीप्रमाणे तप्त झाला आहे. यंदाची युरोपातील उष्णतेची लाट (हिटवेव्ह) इतकी भयानक आहे की, जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, अवघ्या एका आठवड्यात १३०० हून अधिक नागरिकांचा मृत्यू नोंदवला गेला आहे. या उष्णतेला 'सायलेंट किलर' म्हणजेच अदृश्य मारेकरी असे संबोधले आहे. निसर्गाच्या या रौद्र रूपामुळे युरोपमधील जनजीवन विस्कळीत झाले असून, तेथील पायाभूत सुविधा आणि अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडण्याच्या उंबरठ्यावर आहे.***

**जागतिक** आरोग्य संघटनेचे (डब्ल्यूएचओ) महासंचालक टेड्रोस अदनोम घेब्रेयेसस यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, युरोप हा सध्या पृथ्वीवरील इतर भूभागांच्या तुलनेत दुप्पट वेगाने उष्ण होत चाललेला खंड आहे. हवामान बदलामुळे पूर्वी पिढ्यांमध्ये एखाद्या वेळेस येणारी उष्णतेची लाट आता दरवर्षी नियमितपणे धडक देत आहे.

या उष्णतेला 'सायलेंट किलर' म्हणण्याचे मुख्य कारण म्हणजे, युरोपमधील पारंपारिक घरे, शाळा, कार्यालये आणि सार्वजनिक इमारती या थंड हवामानाचा विचार करून बांधण्यात आल्या आहेत. तिथे उष्णतेपासून संरक्षण करणाऱ्या एअर कंडिशनिंगसारख्या सुविधांची मोठी कमतरता आहे. परिणामी, अचानक वाढलेले हे तापमान घरातील लोकांना आणि विशेषतः लहान मुले व वृद्धांना थेट प्रभावित करत आहे.

सामान्यतः युरोपमध्ये जुलै महिन्याच्या उत्तरार्धात उन्हाचा चटका जाणवतो. मात्र, २०२६ मध्ये जूनच्या सुरुवातीलाच तापमानाने सर्व ऐतिहासिक रेकॉर्ड मोडीत काढले आहेत. १९५० नंतरच्या इतिहासामध्ये उन्हाळ्याचा उच्चांक गाठण्यापूर्वीच इतकी प्रचंड उष्णतेची लाट येण्याची ही केवळ दुसरीच वेळ आहे. या उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक फटका फ्रान्सला बसला आहे. तेथे १००० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. फ्रान्समध्ये १९४७ पासून हवामानाची नोंद ठेवण्यास सुरुवात झाली, तेव्हापासूनचे जून महिन्यातील सर्वात उष्ण दिवस यंदा नोंदवले गेले आहेत. तेथील सरासरी तापमान २९.९ अंश सेल्सिअसवर पोहोचले, तर १४७ शहरांनी जूनमधील स्वतःचे सर्वोच्च तापमान पार केले आहे. ४१ हवामान केंद्रांवर तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या वर गेले होते. फ्रान्सच्या इतिहासातील सर्वात उष्ण रात्र ही याच काळात नोंदवली गेली. स्पेनमधील काही भागांत तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. युरोपमधील मृतांमध्ये प्रामुख्याने केअर होम्स आणि खासगी घरांमध्ये राहणाऱ्या वृद्धांची संख्या जास्त आहे. युरोपच्या ऊर्जा क्षेत्राला आणि पायाभूत सुविधांनाही याचा फटका बसला आहे. फ्रान्स आणि हंगेरीसारख्या देशांमध्ये रात्रीच्या वेळीही तापमान अत्यंत उच्च राहिल्यामुळे डॅन्यूबसारख्या प्रमुख नद्यांचे पाणी प्रमाणाबाहेर गरम झाले आहे. अणूऊर्जा प्रकल्प थंड ठेवण्यासाठी या नद्यांच्या पाण्याचा वापर केला जातो. परंतु, हे पाणी आधीच गरम असल्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून अणू प्रकल्पांमधील वीजनिर्मिती पूर्णपणे थांबवावी लागली आहे. पोर्तुगालसारख्या देशांमध्येही उष्णतेच्या लाटेदरम्यान रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण १९ टक्क्यांनी वाढले असून, यामुळे तेथील आरोग्य यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरत आहे.



**स्वरदा वैद्य,**
- लंडन

आजपासून ५० वर्षांपूर्वी म्हणजेच १९७६ मध्ये आलेली उष्णतेची लाट आजच्या तुलनेत सुमारे ३.५ अंश सेल्सिअसने थंड होती, असे दिसून आले आहे. यावरून यंदाची परिस्थिती किती भीषण असेल याची कल्पना करता येईल. १९ व्या शतकाच्या अखेरीस पूर्व औद्योगिक पातळीच्या तुलनेत आज युरोपचे तापमान सरासरी २.५ अंशांपर्यंत वाढले आहे. संपूर्ण जगाचा विचार केल्यास तज्ज्ञांनी जागतिक पातळीवर तापमान वाढीची सरासरी केवळ १.४ अंश सेल्सिअस नोंदविली आहे.

पर्यावरणतज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, युरोपची भौगोलिक रचना उत्तर ध्रुवावरील 'आर्क्टिक' क्षेत्राशी जोडलेली आहे. हा भाग पृथ्वीवरील इतर भागांच्या तुलनेत तीन पटीने अधिक वेगाने तापत आहे. या प्रक्रियेला 'आर्क्टिक ॲम्प्लिफिकेशन' म्हणतात. वाढत्या उष्णतेमुळे उत्तर ध्रुवावरील बर्फ आणि युरोपमधील हिमनद्या (ग्लॅशियर्स) वेगाने वितळत आहेत. एरवी पांढरा शुभ्र बर्फ सूर्याची किरणे अंतराळात परावर्तित करून पृथ्वी थंड ठेवतो. याला 'अल्बेडो इफेक्ट' म्हणतात. परंतु, बर्फ वितळल्यामुळे खाली असलेली गडद रंगाची जमीन आणि समुद्र उघडे पडत असून, ते सूर्याची उष्णता परावर्तित करण्याऐवजी स्वतःमध्ये शोषून घेत आहेत. यामुळे युरोपच्या उत्तर भागात उष्णतेचे एक न संपणारे चक्र तयार झाले आहे.

दुसरे म्हणजे विषुववृत्त आणि उत्तर ध्रुव यांच्यातील तापमानातील फरकामुळे वातावरणात 'जेट स्ट्रीम' नावाचे वेगवान वारे वाहतात. हे वारे युरोपमधील हवामान नियंत्रित ठेवतात. मात्र, बर्फ वितळल्यामुळे ध्रुवीय प्रदेश गरम होत असून, दोन्ही भागांतील तापमानाचा फरक कमी झाला आहे. परिणामी, हे जेट स्ट्रीम वारे दोन भागांत विभागले जात आहेत. या बिघाडामुळे युरोपच्या आकाशात उच्च दाबाची प्रणाली निर्माण होऊन हवा स्थिर होते. ही प्रणाली उत्तर आफ्रिका आणि सहारा वाळवंटातील उष्ण हवा युरोपमध्ये खेचून घेते आणि 'हीट डोम' (उष्णतेचा घुमट) तयार करून ती हवा तिथेच कोंडून ठेवते. गेल्या काही दशकांत युरोपियन युनियनने हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि प्रदूषण नियंत्रणासाठी कडक कायदे लागू केले आहेत. यामुळे कारखाने आणि वाहनांमधून निघणारे घातक सल्फरसारखे सूक्ष्म कण म्हणजेच 'ॲरोसोल्स' वातावरणात जाणे खूप कमी झाले आहे. आरोग्यासाठी हा बदल चांगला असला, तरी याचा एक पर्यावरणीय दुष्परिणाम झाला आहे. हे हवेतील सूक्ष्म ॲरोसोल्स कण आणि त्यांच्यामुळे बनणारे ढग सूर्याची किरणे अडवून ती पुन्हा अवकाशात पाठवत असत, ज्यामुळे पृथ्वीला एक प्रकारे सावली मिळत होती. आता हवा स्वच्छ झाल्यामुळे थेट आणि प्रखर सूर्यप्रकाश युरोपच्या जमिनीवर पडत असून, तापमानवाढीचा वेग वाढला आहे.

जागतिक तापमानवाढीबाबत एरवी विकसनशील आणि गरीब देशांना दूषणे देणाऱ्या युरोपियन देशांनी आता हवामान बदलांबाबतचा शहाजोगपणा आणि बचावात्मक भूमिका सोडून जागतिक सामूहिक उपाययोजनांसाठी सक्रिय पुढाकार घ्यायला हवा.

●●●

# व्हेनेझुएलातील हाहा:काराचा धडा

***दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला हा देश सध्या एका अत्यंत दुर्मीळ आणि भीषण आपत्तीचा सामना करत आहे. देशाची राजधानी काराकासपासून सुमारे १६० किलोमीटर अंतरावर असलेल्या सॅन फेलिप आणि युमारे या शहरांच्या जवळ लागोपाठ दोन प्रचंड मोठे भूकंप झाले. या भूकंपांची तीव्रता रिश्टर स्केलवर अनुक्रमे ७.२ आणि ७.५ इतकी नोंदवली गेली. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या दोन्ही भूकंपांमधील अंतर केवळ ३१ सेकंदांचे होते. निसर्गाच्या या रौद्र रूपामुळे अवघ्या दोन ते तीन मिनिटांतच होत्याचे नव्हते झाले. नागरिकांच्या डोळ्यांसमोर गगनचुंबी इमारतींना तडे गेले, अनेक बहुमजली निवासी संकुले पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली. रस्त्यांवर धुळीचे प्रचंड लोट उसळले होते. नागरिक जिवाच्या आकांताने घराबाहेर पळून आले आणि सतत येणाऱ्या धक्क्यांच्या भीतीने त्यांना पुन्हा घरात जाण्याची हिंमत झाली नाही. १७०० हून अधिक जणांचा बळी घेणाऱ्या या भूकंपांमुळे व्हेनेझुएलाला पुढील कित्येक वर्षे मानवी संकटांचा सामना करावा लागू शकतो.***

**व्हेनेझुएलाची** भौगोलिक रचना कॅरिबियन आणि दक्षिण अमेरिकन भूपट्ट्यांच्या (प्लेट) सीमेवर आहे. कॅरिबियन प्लेट ही दक्षिण अमेरिकन प्लेटच्या तुलनेत दरवर्षी सुमारे २ सेंटीमीटर (०.७९ इंच) वेगाने पूर्वेकडे सरकत आहे. या दोन्ही प्लेट एकमेकांशी समांतर घासल्या जात असल्याने भूगर्भातील खडकांवर वर्षानुवर्षे प्रचंड ताण निर्माण झाला होता. ताज्या भूकंपाच्या रुपाने हा ताण अखेरीस बाहेर पडला. या फॉल्ट सिस्टीमवर गेल्या १२५ वर्षांत एवढा मोठा भूकंप झाला नव्हता. व्हेनेझुएलामधील बांधकाम क्षेत्राशी संबंधित नियम आणि कायदे इतर भूकंपप्रवण देशांच्या तुलनेत तितकेसे काटेकोर आणि सूक्ष्म तपशीलांसह विकसित केलेले नाहीत. दीर्घकाळ मोठा भूकंप न झाल्या-मुळे आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याबाबत आणि नियमित तांत्रिक तपासणीबाबत यंत्रणांमध्ये उदासीनता निर्माण झाली होती, ज्याचा फटका या आपत्तीत बसला. गेल्या १२० वर्षांत जगभरात ६ रिश्टर स्केलपेक्षा जास्त तीव्रतेच्या ४२ घटनांची नोंद झाली आहे. आता त्यात व्हेनेझुएलाची भर पडली आहे.



**आदेश महाजन,**
बांधकाम क्षेत्राचे अभ्यासक

### काराकासमध्ये कहर का?

ताज्या भूकंपाच्या आपत्तीत व्हेनेझुएलाची राजधानी काराकास सर्वाधिक असुरक्षित ठरली. याचे कारण हे शहर एका अरुंद दरीत वसलेले असून, त्याच्या सभोवताली उंच डोंगर आहेत. ही दरी प्रामुख्याने मऊ माती आणि गाळाच्या जाड थरांनी बनलेली आहे. भूकंपाच्या लहरी खडकाळ भागातून या मऊ मातीच्या दरीत प्रवेश करतात, तेव्हा त्यांची गती संथ होते. परंतु त्यांची तीव्रता आणि कंपनांचा विस्तार कित्येक पटीने वाढतो. या प्रक्रियेला भूगर्भशास्त्रामध्ये 'बेसिन ॲम्प्लीफिकेशन' असे म्हणतात. यामुळे दरीभागातील इमारतींना डोंगराळ भागापेक्षा खूप जास्त तीव्रतेचे धक्के बसतात. काराकासची अनियंत्रित आणि दाट लोकवस्ती हीदेखील मानवनिर्मित समस्या भूकंपकाळात महासंकट ठरली. शहरातील डोंगराळ भागांवर गरिबीमुळे लाखो नागरिकांनी अनधिकृत आणि कच्च्या विटा-सिमेंटची घरे बांधली आहेत. या झोपडपट्ट्यांमध्ये किंवा वस्त्यांमध्ये कोणत्याही अभियांत्रिकी नियमांचे किंवा भूकंपरोधक मानकांचे पालन केलेले नाही. मऊ जमिनीवर उभ्या असलेल्या शहराच्या सखल भागातील उंच इमारती आणि डोंगराळ भागातील कच्ची घरे या दोन्ही आघाड्यांवर प्रचंड वित्त व जीवितहानी ओढवली. व्हेनेझुएलाच्या आर्थिक संकटामुळे गेल्या अनेक वर्षांपासून पायाभूत सुविधांच्या देखभालीकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. शहरात १९६७ मध्ये झालेल्या मोठ्या भूकंपानंतर बांधकाम नियमावलीत काही बदल सुचवण्यात आले होते. मात्र त्याची कठोर अंमलबजावणी कधीच झाली नाही.

भारतासारख्या देशाने यातून धडा घेण्याची गरज आहे. भारतीय भूखंड दरवर्षी सुमारे ५ सेंटीमीटर या वेगाने ईशान्य दिशेने सरकत आहे आणि ते युरेशियन भूखंडाला वेगाने धडकत आहे. सामान्य माणसाला हा ५ सेंटीमीटरचा वेग अत्यंत नगण्य वाटू शकतो. परंतु लाखो वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेल्या या प्रक्रियेमुळे हिमालयाच्या निर्मितीसोबतच जमिनीखाली प्रचंड प्रमाणावर दाब निर्माण होत आहे. हा अथांग दाब असह्य होतो, तेव्हा तो भूकंपाच्या रूपाने प्रचंड ऊर्जेसह बाहेर पडतो.

भारताचा तब्बल ५९ टक्के भूभाग हा भूकंपप्रवण क्षेत्रात येतो. भारतीय मानक ब्युरो या संस्थेने नुकताच आपला भूकंपाचा नकाशा अद्ययावत केला आहे. संपूर्ण हिमालयीन पट्टा, जम्मू-काश्मीरपासून ते अरुणाचल प्रदेशपर्यंत, ईशान्य भारत, गुजरातचे कच्छ क्षेत्र आणि अंदमान बेटे ही अतिधोकादायक म्हणजेच झोन ५ आणि झोन ६ मध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. देशाची राजधानी दिल्ली झोन ४ मध्ये (उच्च धोकादायक क्षेत्र) येते. दिल्ली अत्यंत नाजूक अशा गाळाच्या जमिनीवर वसलेली आहे, ज्यामुळे भूकंपाचे धक्के तिथे अधिक तीव्रतेने आणि विध्वंसक स्वरूपात जाणवतात. दुसरीकडे, मुंबई, चेन्नई आणि कोलकाता यांसारखी आर्थिक आणि लोकसंख्येची महाकाय केंद्रे झोन ३ मध्ये (मध्यम धोका) येतात. परंतु, या शहरांमधील लोकसंख्येची अफाट घनता पाहता मध्यम तीव्रतेचा भूकंपदेखील तिथे महाभयंकर विनाश घडवून आणण्यासाठी पुरेसा आहे. भूकंपामुळे थेट माणसांचा मृत्यू होत नाही, तर मानवानेच निर्माण केलेल्या कमकुवत पायाभूत सुविधा आणि अशास्त्रीय पद्धतीने बांधलेल्या इमारती लोकांसाठी मृत्यूचा खरा सापळा ठरतात. आपल्या देशात विशेषतः मोठ्या शहरांमध्ये इमारतींचे बांधकाम करताना भूकंपरोधक नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही. महाराष्ट्रासह अनेक भागांतील जुन्या इमारती आणि अनधिकृत बांधकामे मोठ्या भूकंपाचा साधा धक्कादेखील सहन करू शकणार नाहीत. त्यामुळे ७.५ तीव्रतेचा भूकंप दिल्ली किंवा मुंबईमध्ये आला, तर त्याचे परिणाम मानवी कल्पनेपलीकडचे असतील.

आपत्कालीन यंत्रणा भूकंप आल्यानंतरच आपले काम सुरू करू शकते. पहिल्या साठ मिनिटांचा काळ जीव वाचवण्यासाठी सर्वात महत्त्वाचा असतो. एनडीआरएफकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि बचावकार्याचा मोठा अनुभव आहे. परंतु, बचाव पथके घटनास्थळी पोहोचण्याआधीच लाखो लोकांचे नुकसान झाले असेल, तर काय? त्यामुळे खऱ्या अर्थाने आपली परीक्षा ही जीवितहानी आधीच टाळण्यात आहे. दुर्दैवाने, आजही अनेक नागरिक आणि बांधकाम व्यावसायिक भूकंपाच्या धोक्याकडे गांभीर्याने पाहत नाहीत. सामान्य नागरिक घरे विकत घेताना इमारतींच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत जागरूक होत नाहीत आणि स्थानिक स्वराज्य संस्था कठोर नियम लागू करत नाहीत, तोपर्यंत हा धोका आपल्या डोक्यावर टांगत्या तलवारीसारखा कायम राहणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक गोष्टीसाठी प्रगत साधने उपलब्ध आहेत. पण भूकंपाची अचूक आणि खूप आधी पूर्वसूचना देऊ शकेल, असे कोणतेही तंत्रज्ञान आज अस्तित्वात नाही.

सध्या उपलब्ध असलेल्या पूर्वसूचना प्रणाली केवळ काही सेकंदांचाच वेळ देऊ शकतात.

●●●



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पाऊस आला धावून, घोषणा गेल्या वाहून

राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसाचे आगमन झालेले आहे. राज्यातल्या बहुतांश भागातला शेतकरी आता खऱ्या अर्थाने सुखावला आहे. लावलेल्या खरिपाच्या पेरण्या आता शेतकरी लगबगीने पूर्ण करतो आहे. काही भागांत अजूनही पुरेसा पाऊस जरी पोहोचला नसला तरी आठ दिवसांपूर्वी जे निराशाजनक आणि चिंताजनक चित्र होते ते आज राहिलेले नाही. चार-आठ दिवसांतला हा पाऊस पाच दोन टक्के का असेना, परंतु शेतीला आणि पिण्याच्या पाण्याला सहाय्यभूत ठरतो आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई आणि परिसरामध्ये धो-धो पाऊस कोसळला. जून महिन्यामध्ये मुंबईसह राज्यात चाळीस ते पंचेचाळीस टक्के पावसाचा तुटवडा नोंदला गेला. आता ज्या पद्धतीने पाऊस अनेक ठिकाणी हजेरी लावतो आहे, असेच प्रमाण जर पुढच्या दोन-तीन आठवडाभर राहिले तर मुंबईसह राज्याची पिण्याच्या पाण्याची समस्या पन्नास टक्क्यांनी संपुष्टात येईल. वेधशाळांच्या अंदाजाप्रमाणे १५ जुलैनंतर पाऊस पुन्हा विश्रांती घेण्याची शक्यता व्यक्त झालेली आहे. मात्र साधारण दरवर्षीचा अनुभव लक्षात घेता जुलै आणि ऑगस्टच्या पहिल्या दोन आठवड्यांत पाऊस आपला सगळा अनुशेष भरून काढतो. सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा प्रकार जुलै महिन्यातच पाहायला मिळत असतो. कोकण-मुंबई परिसरामध्ये जुलैतल्या पावसाचा विक्रम अनेकवेळेला नोंदला गेला आहे. दरवर्षीपेक्षा पंधरा-वीस टक्के पाऊस कमी होईल. हा अंदाज गृहित धरून सध्या कोसळत असलेल्या पावसाच्या पाण्याचा अधिकाधिक साठा करणे हाच पुढच्या वर्षभरासाठीचा प्रभावी उपाय ठरतो. दुर्दैवाने पाऊस जसा धो-धो कोसळतो, त्याचे पाणी चारही दिशांनी वाहून जाते. तसाच प्रकार सरकारच्या घोषणांचा होतो. पावसासंबंधीचा किंवा जलसिंचनासंदर्भातल्या घोषणांचा धो-धो पाऊस पडतो आणि या घोषणादेखील पावसाच्या पाण्यात वाहून जातात. पावसाळा संपला की, अगदी पुढच्या महिना-दीड महिन्यातच अनेक शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते. आज महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी महापालिका आहेत त्या सगळ्या ठिकाणी पाण्याची महाटंचाईच हमखासपणे पाहायला मिळते.

**या मुंबईला तुडुंब पावसाचे तडाखे**

राज्याची राजधानी असलेली मुंबई ही खरे तर पावसाचीदेखील राजधानी म्हणायला हवी. परंतु दिल्ली ही देशाची राजधानी आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या दोन्ही राजधान्यांमध्ये समस्यांचे प्रमाणही प्रचंड आहे. गेल्या काही वर्षांपासून प्रदूषणाबरोबरच या दोन्ही राजधान्यांमध्ये शुद्ध पाण्याचा पुरवठा होऊ शकत नाही. आणि दोन्ही राजधान्यांमध्ये पावसाळ्यामध्ये वाहतूक कोंडी किंवा सखल भागात पाणी साचण्याचे प्रकार समान पद्धतीने पाहायला मिळतात. अर्थात मुंबईत पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्यांचा विक्रम कोणतेच महानगर मोडू शकत नाही. मर्यादित भूभागावर तुडुंब लोकसंख्या असलेल्या या महानगरीला आता तुडुंब समस्यांचा दर पावसाळ्यात सामना करावा लागतो. गेल्या चार पाच दिवसांत मुंबई आणि परिसरात मुसळधार पाऊस झाला. कदाचित जुलै महिन्यात जेवढा पाऊस पडायला हवा त्याच्या पन्नास टक्के पाऊस या तीन चार दिवसांतच पडून गेला असण्याची शक्यता आहे. मुंबईत पडणारा पाऊस हा एकाअर्थी बिनकामाचा पाऊस ठरतो. कारण या पाण्याचा ना शेतीसाठी उपयोग होतो ना पिण्याच्या पाण्यासाठी. तो साठवला जातो. एवढा पाऊस पडतो तो सगळा पुन्हा समुद्राला जाऊन मिळतो. मात्र या तुडूंब पावसाचे तुडूंब तडाखे मुंबईला दरवर्षी सोसावे लागतात. गेल्या दहा वर्षांत नवनवीन समस्यांनी त्यात भर घातली आहे. त्यात मॅनहोलमध्ये पडून मृत्यू होणे, झाडं किंवा झाड्यांच्या फांद्या कोसळून जीव गमावण्याची वेळ येणे, ठिकठिकाणी असलेले अगडबंब जाहीरातींचे फलक कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता असते. आणि हा अपघाताचा प्रकार पाच दहा जणांचे बळी घेणारा म्हणावा लागतो. मोडकळीस आलेल्या किंवा जुन्या जीर्ण इमारतींचे कोसळणे, हे तर मुंबईच्या पावसाळ्याचे एक अविभाज्य लक्षण असते. सरकारने या सगळ्या प्रकारांबाबत कितीही सावधगिरीची उपाययोजना केली तरी ती पुरेशी ठरूच शकत नाही. कारण प्रचंड लोकसंख्येचा दबाव या महानगरीवर येतो आहे. आणि तो आता सहन करण्यापलिकडे गेल्याचे याही पावसाळ्यातून सिद्ध झाले आहे.

**मुळातच नाही तर मुठेत कुठून येणार?**


राज्यातील पाणीटंचाईचा प्रश्न केवळ पावसाळ्यातल्या पाण्यातून सुटू शकेल अशी आज तरी स्थिती नाही. कारण गेल्या पंधरा-वीस वर्षांत राज्यात एकही नवीन जलसिंचन प्रकल्प अस्तित्वात आलेला नाही. कोकणातल्या ज्यादा पावसाचे पाणी कोयना धरणात आणण्यासंदर्भात दरवर्षी घोषणा होत राहते किंवा समुद्राच्या पाण्याचे काही प्रमाणात गोड पाणी निर्माण करण्याचा प्रकल्पही असाच पाच-दहा वर्षांपूर्वी मंजूर केला गेला. परंतु अजूनही यासारखे अनेक प्रकल्प रखडल्याचे पाहायला मिळते. मोठा गाजावाजा करून सुरू झालेली जलयुक्त शिवार योजना घोषणांच्याच महापुरात वाहून गेल्याचे म्हणावे लागते. आज राज्यातल्या एकाही गावात चोवीस तास पाणी मिळू शकत नाही. केंद्र सरकारच्या मदतीने 'हर घर जल आणि नल' अशी योजना सुरू झाली. परंतु महाराष्ट्रात 'जलही नाही आणि नलही नाही' अशी परिस्थिती आहे. नाशिकला गोदावरीसारखी सर्वात मोठी नदी लाभली, पण या महानगराची पाण्याची गरज सरकार भागवू शकलेले नाही. यंदाच्या कुंभमेळ्याला शाही स्नानापुरते तरी पाणी गोदावरीत असेल की, नाही याबद्दलही आता शंका वाटू लागली आहे. पुण्यासारख्या महानगराला मुळा मुठासारख्या दोन नद्या लाभल्या असून, पाण्याची तीव्र टंचाई दरवर्षी निर्माण होत असते. पुण्यात काय उणं असे आपण म्हणतो. परंतु पाण्याच्याबाबतीत 'मुळातच नाही तर मूठेत कुठून येणार' अशी तिथली पाण्याची परिस्थिती आहे. खरे तर राज्य सरकारच्या योजना मुळातच नाही. म्हणूनच आज पाऊस पडूनही पाण्याची समस्या कायम राहते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

वेळ, शब्द आणि संधी या तिन्ही गोष्टी एकदा निघून गेल्यावर परत कधीच येत नाहीत. म्हणून आजचा योग्य निर्णय आजच घ्या. कारण उद्याचा विश्वास कोणाला आहे?

## पंचांग



**रविवार, ५ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ कृष्ण पंचमी**
**नक्षत्र : शततारका**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कुंभ**

**रवी उदय- ०६-०७**
**रवी अस्त- १९-१९**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



## कोलमाचे वडे




**हे महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील (विशेषतः आगरी-कोळी पद्धतीचे) एक अतिशय चवदार, खमंग आणि कुरकुरीत पदार्थ आहे. हे कोळंबीच्या (कोलीम) छोट्या प्रजातीपासून बनवले जातात.**

★ **साहित्य :** १ कप कोलीम (लहान कोळंबी), १ कप कांद्याची पात, १ अंडे, १/२ कप तांदळाचे पीठ, २ हिरव्या मिरच्या (बारीक चिरलेल्या), १०-१२ लसूण पाकळ्या (बारीक चिरलेल्या), चिंचेचा कोळ किंवा लिंबाचा रस, २ टीस्पून हळद पूड, ३-४ टीस्पून लाल तिखट, कोथिंबीर (बारीक चिरलेली), चिमूटभर हिंग, मीठ- चवीनुसार, बेसन पीठ- १ कप.

★ **कृती :** सर्वप्रथम कोलीम स्वच्छ धुऊन घ्या. त्यात कांद्याची पात, लसूण, हिरवी मिरची, कोथिंबीर, हळद, लाल तिखट, मीठ, चिंचेचा कोळ किंवा लिंबाचा रस तांदळाचे पीठ आणि बेसन पीठ घालून मिश्रण एकजीव करा.
या मिश्रणाचे छोटे-छोटे वडे (गोळे) तयार करा. तव्यावर तेल गरम करा. तयार वडे गरम तेलात सोडा. मध्यम आचेवर वडे सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा.

या मिश्रणाचे छोटे-छोटे गोळे करून हातावर चपटे (वडे किंवा कटलेटच्या आकारात) थापून घ्या.




# इजिप्तचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ ने विजय

## ऑस्ट्रेलियाचा प्रवास संपला! ७ जुलैला अर्जेंटिनाशी भिडणार



**डॅलस स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध इजिप्तने पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ ने विजय मिळवला आणि प्रथमच फिफा विश्वचषकातील बाद फेरी जिंकून उपउपांत्यपूर्व फेरीत आपले स्थान निश्चित केले. आता इजिप्तचा सामना ७ जुलैला अर्जेंटिनाशी होईल. या सामन्याच्या निर्धारित वेळेत आणि अतिरिक्त वेळेत सामना १-१ असा बरोबरीत सुटल्यानंतर पेनल्टी शूटआऊटने सामन्याचा निकाल लागला. इजिप्तने आपल्या चारही पेनल्टी यशस्वीरित्या गोलमध्ये रुपांतरित केल्या, तर ऑस्ट्रेलियाचे हॅरी साऊटर आणि लुकास हॅरिंग्टन यांनी पेनल्टी शूटआऊटमध्ये आपले प्रयत्न चुकवले.**

■ आर्लिंग्टन

**पहिल्या** हाफमध्ये ऑस्ट्रेलियाने आक्रमकपणे सामन्याची सुरुवात केली आणि ख्रिश्चन व्होल्पाटोचा लांबून मारलेला शॉट क्रॉसबारला लागला. काही मिनिटांनंतरच १३ व्या मिनिटाला इजिप्तने आघाडी घेतली. इमाम अशूरने करीम हाफेझच्या सेट-पीसमधील क्रॉसवर एका उत्कृष्ट हेडरने गोल केला. विश्वचषकातील अशूरचा हा सलग दुसरा गोल होता. दुसऱ्या हाफमध्ये ऑस्ट्रेलियाने बरोबरी साधली. ५५ व्या मिनिटाला इजिप्तचा बचावपटू मोहम्मद हानी, एडन ओ'नीलची फ्री-किक क्लिअर करण्याच्या प्रयत्नात असताना हेडरने चेंडू स्वतःच्याच गोलमध्ये मारला. या आत्मघाती गोलमुळे स्कोअर १-१ असा बरोबर झाला आणि सामना रोमांचक बनला.

अतिरिक्त वेळेत इजिप्तला सामना संपवण्याची सुवर्णसंधी मिळाली होती. परंतु ऑस्ट्रेलियन गोलरक्षक पॅट्रिक बीचने रामी राबियाच्या जोरदार हेडरवर एका हाताने अप्रतिम बचाव केला. त्यानंतर मोहम्मद सलाहने हैसम हसनसाठी एक संधी निर्माण केली. परंतु हॅरी साऊटरने उत्कृष्ट ब्लॉक करून ऑस्ट्रेलियाला वाचवले. नियमित वेळ आणि अतिरिक्त वेळ अनिर्णित राहिल्यानंतर, सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला. इजिप्तने आपल्या चारही पेनल्टी यशस्वीरित्या गोलमध्ये रुपांतरित केल्या. स्टार खेळाडू मोहम्मद सलाहने एका शानदार पॅनेन्का शैलीत पेनल्टीचे गोलमध्ये रुपांतर केले. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचे हॅरी साऊटर आणि लुकास हॅरिंग्टन यांनी त्यांच्या पेनल्टी चुकवल्या, ज्यामुळे इजिप्तला ४-२ ने विजय मिळाला.

**६ जुलैचा उपउपांत्य पूर्व सामना**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| पहाटे ०१:३० | ब्राझील विरुद्ध नॉर्वे |
| पहाटे ५:३० | मेक्सिको विरुद्ध इंग्लंड |

# गतविजेत्या अर्जेंटिनाने केप व्हर्देविरुद्ध अनपेक्षित पराभव थोडक्यात टाळला

■ मियामी

**मियामी** स्टेडियमवर गतविजेत्या अर्जेंटिनाने विश्वचषकाच्या बाद फेरीतील केप व्हर्देविरुद्धचा अनपेक्षित पराभव थोडक्यात टाळला. अर्जेंटिनाने केप व्हर्देला ३-२ ने पराभूत करून उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. दोन्ही संघांमध्ये अत्यंत चुरशीचा सामना झाला. मात्र अतिरिक्त वेळेत केप व्हर्देने स्वतःच्याच पायावर धोंडा मारून घेतला. केप व्हर्देने संपूर्ण सामन्यात दमदार खेळ केला, पण अखेरीस एक संधी गमावली.

पहिल्या हाफमध्ये लिओनेल मेस्सीने अर्जेंटिनाला आघाडी मिळवून दिली. मेस्सीने २९ व्या मिनिटाला गोल करून अर्जेंटिनाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मात्र, दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला ५८ व्या मिनिटाला डेरॉय डुआर्टेने केप व्हर्देसाठी गोल करून स्कोअर १-१ असा बरोबरीत आणला. खेळाच्या संपूर्ण ९० मिनिटांपर्यंत स्कोअर बरोबरीतच राहिला. त्यानंतर लिसँड्रो मार्टिनेझने अतिरिक्त वेळेत दुसरा गोल करून अर्जेंटिनाला आघाडी मिळवून दिली. मार्टिनेझने ९२ व्या मिनिटाला गोल केला.

मार्टिनेझच्या गोलनंतर अर्जेंटिना हा सामना सहज जिंकेल असे वाटत होते. परंतु सिडनी लोपेस कॅब्रेलने १०३ व्या मिनिटाला गोल करून अर्जेंटिनाला आश्चर्यचकित केले. कॅब्रेलच्या गोलमुळे स्कोअर २-२ असा बरोबरीत आला.

# श्रीलंकेविरुद्ध साईची १६८ धावांची खेळी

■ कोलंबो

**गॉल** येथे सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटीच्या तिसऱ्या दिवशी भारतीय 'अ' संघाच्या फलंदाजांनी श्रीलंके संघाविरुद्ध दमदार कामगिरी सुरुच ठेवली. सलामीवीर साई सुदर्शनने १६८ धावा, देवदत्त पडिक्कल ९४, ध्रुव जुरेल ५३ धावांची खेळी करून चांगली कामगिरी केली. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ३६६ धावा केल्या होत्या. त्यात कर्णधार साहन अराच्चिगेने सर्वाधिक १२७ धावा केल्या. या प्रत्युत्तरात साई सुदर्शनने २६७ चेंडूंत ७ षटकार आणि २२ चौकारांसह १६८ धावा ठोकल्या.

# विश्वचषकात कोलंबियाची अपराजित मालिका कायम

## घानाला १-० ने पराभूत करून उपउपांत्यपूर्व फेरीत

■ कॅन्सस सिटी

**अमेरिकेतील** कॅन्सस सिटी स्टेडियमवर कोलंबियाने चांगली खेळी करून घातक घानाला १-० ने सहज हरवून फिफा विश्वचषकाच्या उपउपांत्य फेरीत प्रवेश केला. यासह कोलंबियाने या विश्वचषकातील आपली अपराजित मालिका कायम ठेवली. उपउपांत्यपूर्व फेरीत ८ जुलैला कोलंबियाचा सामना स्वित्झर्लंडशी होईल.

या सामन्यातील घानाला लक्ष्यावर एकही शॉट मारता आला नाही. दुसरीकडे कोलंबियाने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व गाजवले. त्यांनी १४ व्या मिनिटाला गोल करून घानावर दबाव आणला. योहान आरियासने हा गोल



केला. १० व्या मिनिटाला बदली खेळाडू म्हणून आलेल्या लुईस सुआरेझने उभ्या असलेल्या आरियासला पास दिला, ज्याने वेळ न घालवता गोल केला. अँटोनियो सिमिओन्योने घानासाठी प्रयत्न केला. मात्र त्याचा जवळून मारलेला शॉट क्रॉसबारवरून गेला. कोलंबियाने पहिल्या हाफमध्ये अनेक संधी निर्माण केल्या. मात्र त्यांना गोल करण्यात अपयश आले. दुसऱ्या हाफमध्ये दोन्ही संघांनी गोल करण्याचे अनेक प्रयत्न केले, पण ते अयशस्वी ठरले. कोलंबियाने सर्वाधिक संधी निर्माण केल्या.

६९ व्या मिनिटाला असे वाटले की, कोलंबियाने आपला दुसरा गोल केला. मात्र, तसे झाले नाही. पार्टेचा शॉट गोलपोस्टच्या बाहेर गेला. यानंतरही कोलंबियाच्या आक्रमणाने घानाची परीक्षा घेणे सुरुच ठेवले. या सामन्यातील घानाची एकमेव चांगली गोष्ट ही होती की, त्यांनी दुसरा गोल होऊ दिला नाही. मात्र, यामुळे त्यांचा पराभव टळला नाही.

# वैभव सूर्यवंशीवर दबाव टाकू नका

## माजी कर्णधार कपिल देव यांचे वक्तव्य

■ नवी दिल्ली

**भारतीय** युवा सलामीवीर फलंदाज वैभव सूर्यवंशीबद्दल विश्वचषक विजेते माजी भारतीय कर्णधार कपिल देव यांनी एक महत्त्वाचे वक्तव्य केले. कपिल देव म्हणाले की, मी त्याला फारसा खेळताना पाहिलेले नाही. तो नक्कीच मोठा प्रतिभावान खेळाडू आहे. सध्या त्याच्याबद्दल आपण खूप मोठे मोठे बोलत आहे. खूप मोठ्या अपेक्षा व्यक्त करत आहोत. त्याला थोडा वेळ द्यायला हवा. त्याच्यावर इतका दबाव टाकू नका. तो अजून खूप लहान आहे आणि प्रत्येक गोष्ट समजून घेण्याइतके त्याचे वयही झालेले नाही.

# फिडेची क्रॅम्निकवर २ वर्षांची बंदी

■ नवी दिल्ली

**जागतिक** बुद्धिबळ महासंघाच्या (फिडे) नीती आणि शिस्तपालन आयोगाने (ईडीसी) माजी विश्वविजेता व्लादिमीर क्रॅम्निकवर दोन वर्षांची शिस्तभंगाची बंदी घातली आहे. मात्र या बंदीचे शेवटचे एक वर्ष तीन वर्षांच्या परिक्षा कालावधीसाठी स्थगित केले जाईल.

परिवीक्षा कालावधीत क्रॅम्निक कोणत्याही नवीन उल्लंघनासाठी दोषी न आढळल्यास त्याच्यावर केवळ एक वर्षाची सक्रिय बंदी असेल. फिडे व्यवस्थापन मंडळ आणि फिडे फेअर प्ले आयोगाने दाखल केलेल्या तक्रारींनंतर हे प्रकरण सुरू करण्यात आले. या तक्रारींमध्ये असा आरोप करण्यात आला होता की, क्रॅम्निकने पुरेसा आधार नसताना ग्रँडमास्टर डेव्हिड नवारा आणि दिवंगत ग्रँडमास्टर डॅनियल नरोडित्स्की यांच्यासह अनेक बुद्धिबळपटूंवर सोशल मीडिया आणि सार्वजनिक मंचांवर फसवणूक केल्याचा जाहीरपणे आरोप केला होता.

# इंग्लंडचा भारतावर विजय! पदार्पणात वैभव सूर्यवंशी अपयशी

■ मँचेस्टर

**मँचेस्टर** येथे झालेल्या पाच टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात आज इंग्लंडने भारतावर ४ विकेटने विजय मिळवून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. भारताने इंग्लंडपुढे विजयासाठी १९० धावांचे आव्हान दिले होते. ते जेकब बेथेलच्या ७६ धावांच्या बळावर इंग्लंडने १९ षटकांत पूर्ण केले. या सामन्याद्वारे सलामीवीर वैभव सूर्यवंशीने वयाच्या १५ वर्षे आणि ९९ दिवशी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून सचिन तेंडूलकरचा विक्रम मोडला. तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा सर्वात तरुण भारतीय ठरला. मात्र त्याला फारसे काही करता आले नाही. त्याने १० चेंडूत २ षटकारांसह १४ धावा केल्या.

अभिषेक शर्मा ४३, ईशान किशन ४९, श्रेयस अय्यर ३७, टिळक वर्मा नाबाद २४ धावा केल्यामुळे भारताला निर्धारित षटकांत ७ बाद १९० धावांपर्यंत पोहोचता आले. या धावसंख्येचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली. सलामीवीर फिल सॉल्ट आणि जोस बटलर या दोन्ही फलंदाजांना साधा भोपळाही फोडता आला नाही. त्यामुळे इंग्लंडची अवस्था ०.५ षटकात २ बाद १ धाव अशी झाली होती. मात्र हॅरी ब्रूकने आक्रमक फलंदाजी करून अर्शदीप सिंगच्या तिसऱ्या षटकात २७ धावा ठोकल्या. त्यानंतर अक्षर



पटेलने हॅरी ब्रूकला झेलबाद केले. त्याने १५ चेंडूत ३९ धावा केल्या. जेकब बेथेल आणि टॉम बँटन यांनी संघाचा डाव सावरला. त्यानंतर टॉम बँटनला ३२ चेंडूवर ३९ धावांवर अर्शदीप सिंगने बाद केले. मग विल जॅक्स ९ धावांवर बाद झाला. जेकब बेथेल आक्रमक फलंदाजी करत होता. त्याने रवी बिश्नोईच्या १७ व्या षटकात २९ धावा ठोकून हा सामना इंग्लंडच्या बाजूने झुकवला आणि संघाला १९ षटकांत विजय आकडा गाठून दिला. बेथेलने ४६ चेंडूंत ५ चौकार आणि ५ षटकांसह नाबाद ७६ धावा केल्या.

## मणिपूर पंचायत निवडणुकांची मुदत याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

■ इम्फाळ



**मणिपूर** उच्च न्यायालयाने राज्यातील पंचायत निवडणुका घेण्याची अंतिम मुदत १६ ऑक्टोबरपर्यंत वाढवणाऱ्या आदेशाविरोधात दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. फेरोइजाम हेरामानी आणि इतरांनी उच्च न्यायालयाच्या १९ मे २०२६ च्या आदेशाविरुद्ध याचिका दाखल केली होती.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी मणिपूर सरकारतर्फे बाजू मांडताना सांगितले की, राज्य सरकार उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्यास बांधिल आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेतल्यास न्यायालयाचा अवमान होऊ शकतो. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंग आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने सांगितले की, उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही ठोस कारण याचिकाकर्त्यांना देता आले नाही. मणिपूरमधील सध्याची कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती आणि फेब्रुवारी २०२५ पासून लागू असलेली राष्ट्रपती राजवट या विलक्षण परिस्थितीमुळे निवडणुका पुढे ढकलण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य मानण्यात आला.

## तृणमूलच्या ३ खात्यांचा तपशील द्या कोलकाता हायकोर्टाचे बँकेला निर्देश

■ कोलकात्ता



**पश्चिम** बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूलच्या तीन बँक खात्यांचे बाह्य व्यवहार गोठवल्याबद्दल त्यांनी कोलकाता हायकोर्टात याचिका दाखल केली. सुनावणी प्रलंबित असेपर्यंत हायकोर्ट निवृत्त न्यायाधीशांमार्फत संयुक्त विशेष अधिकाऱ्यांमार्फत ही खाती चालवण्याचा विचार करत आहे. या खात्यांमध्ये किती रक्कम जमा आहे, याचा तपशील ७ जुलैपर्यंत सादर करण्याचे निर्देश हायकोर्टाने खासगी बँकेच्या सेंट्रल प्लाझा शाखेला दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जुलै रोज होणार आहे.

तृणमूलमधील बंडखोर आमदारांनी, खात्यांमधील निधीच्या स्त्रोतांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संशयास्पद व्यवहारांची चौकशी करण्यासाठी बिधाननगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी बँकेला खाती गोठवण्याचे निर्देश दिले. तृणमूलच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, खाती गोठवल्यामुळे राजकीय पक्षाचे कामकाज ठप्प झाले असून, मूलभूत अधिकारांचे उल्लंघन झाले आहे.

देश विदेश

## संयुक्त राष्ट्रांना आर्थिक चणचण! ऑगस्ट अखेरपर्यंत निधी संपणार

■ न्युयॉर्क

**तरलतेचे** संकट कमी करण्यासाठी उपाययोजना करूनही, ऑगस्ट महिन्याच्या अखेरपर्यंत राष्ट्रांकडील रोख रक्कम संपू शकते, असा इशारा संयुक्त राष्ट्रांच्या (युएन) अधिकाऱ्यांनी दिला आहे.

संयुक्त राष्ट्रांचे वित्त प्रमुख आणि सहायक महासचिव-चंद्रमौली रामनाथन म्हणाले की, संस्थेकडे ऑगस्ट महिन्यानंतरचा निधी नाही. काही देयके पुढे ढकलून संयुक्त राष्ट्र सप्टेंबरमधील आपली वार्षिक उच्चस्तरीय बैठक नियोजित वेळेनुसार घेईल. परंतु त्यानंतरचे कामकाज सदस्य राष्ट्रांनी त्यांची देयके भरण्यावर अवलंबून असेल.

हे संकट मुख्यत्वे संयुक्त राष्ट्रांच्या चीन आणि अमेरिका या दोन सर्वात मोठ्या देणगीदारांनी योगदान न दिल्यामुळे ओढावले आहे. चीन संयुक्त राष्ट्रांना २० टक्के निधी पुरवतो. तर अमेरिका २२ टक्के निधी पुरवते. चीनकडून यावर्षीचे ४३० दशलक्ष डॉलर येणे बाकी आहे, तर अमेरिकेवर सुमारे २ अब्ज डॉलरची थकबाकी आहे.

निधीची चणचण कमी करण्यासाठी, आमसभेने आपला एक नियम स्थगित केला आहे. या नियमानुसार संयुक्त राष्ट्रांना, खर्च न झालेला निधी सदस्य राष्ट्रांना परत करणे आवश्यक असते. महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी याचे स्वागत केले आहे. भारताने फेब्रुवारीमध्ये आपले ३५ दशलक्ष डॉलर्सचे योगदान दिले.

## अमेरिकेचे लष्कर अखेर नायजेरियातून माघारी

■ अबुजा

**अमेरिकेने** नायजेरियातून आपल्या बहुतेक सैन्याला मागे घेतले. मे महिन्यात इस्लामिक स्टेटविरुद्धच्या यशस्वी संयुक्त दहशतवादविरोधी मोहिमेनंतर हा निर्णय घेण्यात आला. मात्र नायजेरिया सरकारच्या विनंतीनुसार दोन्ही देशांत गुप्तचर माहिती देवाणघेवाण करण्याचे काम सुरूच राहणार आहे. नायजेरियाच्या सैन्याने आपल्या मोहिमेवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

मे महिन्यात नायजेरियाच्या लेक चाड भागात अमेरिकन आणि नायजेरियाच्या सैन्याने संयुक्त मोहीम राबवली होती, ज्यामध्ये आयसिसचा जागतिक उपकमांडर अबू-बिलाल अल-मिनुकी मारला गेला. या यशस्वी मोहिमेनंतर आता अमेरिकन कमांड जनरल डॅगविन अँडरसन यांनी पुष्टी केली आहे की, फेब्रुवारीमध्ये तैनात करण्यात आलेल्या २०० पैकी बहुतांश अमेरिकन सैनिकांनी माघार घेतली. हे सैन्य नायजेरियातील दहशतवादी कारवायांचा बीमोड करण्यासाठी पाठवले होते. अमेरिकेचा उद्देश थेट युद्ध करण्याचा नसून, केवळ विशिष्ट लक्ष्यित कारवाईसाठी गुप्तचर माहिती आणि विशेष मदत पुरवणे हा होता.

## अब्जाधीश ब्रायन जॉन्सन दुर्मीळ आजाराने त्रस्त

■ न्यूयॉर्क



**अमेरिकन** अब्जाधीश आणि प्रसिद्ध बायोहॅकर ब्रायन जॉन्सन यांनी एक्सवर पोस्ट शेअर करून त्यांना 'ऑटोइम्यून गॅस्ट्राइटिस' या दुर्मीळ आजार झाल्याचे जाहीर केले. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये माझे पोट स्वतःलाच खात आहे, अशा शब्दांत या आजाराचे गांभीर्य व्यक्त केले आहे. ब्रायन जॉन्सन यांनी सांगितले की, ते खूप काटेकोरपणे डाएट आणि सप्लिमेंट्स घेत असूनही त्यांचे फेरिटिन आणि लोहाचे प्रमाण सतत कमी राहत होते. या आजारात शरीराची रोगप्रतिकारशक्ती पोटातील सिड आणि 'इन्ट्रिन्सिक फॅक्टर' तयार करणाऱ्या पेशींवर हल्ला करून त्यांना नष्ट करते. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, या आजारामुळे पोटाच्या अस्तरावर झालेले नुकसान भरून काढता येत नाही किंवा तो पूर्णपणे बरा करता येत नाही.

## मेघालयात पावसात सर्वाधिक घट शेती व जलस्त्रोतांबाबत चिंता वाढली

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ शिलाँग

**सर्वाधिक** पाऊस पडणारे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेघालयात यंदाच्या हंगामात अत्यल्प पावसाची नोंद झाली आहे. भारतीय हवामान विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार, ईशान्य भारतातील सर्व राज्यांमध्ये



मेघालयात सर्वाधिक म्हणजेच ७४ टक्के पावसाची कमतरता आढळली आहे.

१ जून ते १ जुलै या कालावधीत मेघालयात केवळ १९२.९ मिमी पावसाची नोंद झाली, तर या काळात सरासरी पाऊस ७५०.८ मिमी इतका होतो. १ जुलै रोजीही राज्यात केवळ ३ मिमी पाऊस झाला, तर सरासरी २८.७ मिमी पाऊस अपेक्षित होता. या परिस्थितीमुळे शेती, जलस्त्रोत आणि पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, मेघालयातील सोहरा (चेरापुंजी) आणि मावसिनराम ही ठिकाणे जगातील सर्वाधिक पावसासाठी प्रसिद्ध आहेत. हवामान बदलाचा परिणाम राज्यात स्पष्टपणे जाणवत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

## आग लागलेल्या आधुनिक रिफायनरीचे अखेर पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

■ बालोतरा

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थान दौऱ्यात बालोतरा जिल्ह्यातील पचपदरा येथे देशातील सर्वात आधुनिक रिफायनरीचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी रिफायनरीच्या कंट्रोल रूमला भेट देऊन तज्ज्ञांशी चर्चा केली. जयपूर मेट्रोच्या फेज-२ प्रकल्पाची आभासी पद्धतीने पायाभरणी केली. याच रिफायनरीतील क्रूड डिस्टिलेशन युनिट आणि व्हॅक्यूम डिस्टिलेशन युनिटमध्ये २० एप्रिल रोजी आग लागली होती. उद्घाटनाच्या नियोजित तारखेच्या एक दिवस आधी झालेल्या या दुर्घटनेमुळे पंतप्रधानांचा पूर्वनियोजित दौरा पुढे ढकलण्यात आला होता. यावेळी बोलताना मोदी म्हणाले की, जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती गॅस सिलिंडरची किंमत दोन हजार रुपयांपर्यंत जाऊ शकली असती. मात्र, केंद्र सरकारच्या प्रभावी नियोजनामुळे सिलिंडर ९५० रुपयांत उपलब्ध होत आहे. भाजपा सरकार केवळ प्रकल्पांची पायाभरणी करत नाही, तर ते पूर्णत्वास नेण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेते. दोन महिन्यांपूर्वी रिफायनरीत झालेल्या अपघातानंतर अल्पावधीत काम पूर्ण केल्याबद्दल संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे त्यांनी कौतुक करून म्हणाले की, आव्हाने कितीही मोठी असली तरी नवा भारत आपल्या संकल्पांपासून मागे हटत नाही. पश्चिम आशियातील युद्धामुळे २१व्या शतकातील सर्वात मोठे ऊर्जा संकट निर्माण झाले होते.

## कांदा खरेदी दरात १४५ रुपयांची वाढ



■ नाशिक

**कांदा** उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेत नाफेड आणि एनसीसीएफने कांद्याच्या खरेदी दरात पुन्हा एकदा वाढ केली आहेक्विंटलमागे १४५ रुपयांची दरवाढ करण्यात आली. आजपासून नवीन दर लागू करण्यात आला. या वाढीनंतर कांद्याचा खरेदी दर २,१२५ रुपये प्रति क्विंटल झाला आहे.

यापूर्वी १९ जून रोजी नाफेड आणि एनसीसीएफने कांद्याचा खरेदी दर १,७३० रुपये प्रति क्विंटल जाहीर केला होता. त्यानंतर दर वाढवून १,८७५ रुपये करण्यात आला होता. आता पुन्हा १४५ रुपयांची वाढ जाहीर करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.विशेष म्हणजे, ए ग्रेडसह सर्व प्रकारच्या कांद्याची खरेदी करण्यात येणार असल्याने उत्पादकांना दिलासा मिळणार आहे. नाफेडकडून कांदा खरेदी सुरू झाली तेव्हा सुरुवातीला १,२३५ रुपये प्रति क्विंटल दर जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर २६ मे रोजी हा दर वाढवून १,५८० रुपये करण्यात आला. त्या वेळी एका दिवसात ३१० रुपयांची वाढ करण्यात आली होती.

## करूळ घाटामध्ये दरड कोसळली

■ तळेरे

**करूळ** घाटात काल दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दरड कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक सुमारे दोन तास पूर्णपणे ठप्प झाली. दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जेसीबीच्या सहाय्याने दरड हटवून प्रथम एकेरी वाहतूक सुरू केली. त्यानंतर रस्त्यावर पडलेले महाकाय दगड फोडून सायंकाळी उशिरा वाहतूक पूर्णपणे सुरळीत करण्यात आली. गेल्या चार-

### दोन तास वाहतूक ठप्प

पाच दिवसांपासून वैभववाडी तालुक्यासह सह्याद्री पट्ट्यात दमदार पाऊस सुरू आहे. या मुसळधार पावसामुळे गगनबावड्यापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या करूळ घाटात अचानक मोठी दरड कोसळली. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद झाली.

घटनेची माहिती मिळताच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सहाय्यक अभियंता पवन पाटील घटनास्थळी दाखल झाले. घाट मार्गाच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असलेल्या वेल्हाळ कंपनीच्या जेसीबी व इतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने दरड हटविण्याचे काम तातडीने हाती घेण्यात आले. सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर घाटातून एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली.

दरडीसोबत रस्त्यावर दोन महाकाय दगडही कोसळले होते. हे दगड यंत्राच्या सहाय्याने फोडून हटविण्यात आले. त्यामुळे सायंकाळी उशिरा संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

## दिल्ली दंगल प्रकरणी उमर खालिद, शरजील इमाम यांचा जामीन फेटाळला

■ नवी दिल्ली

**दिल्ली** दंगल प्रकरणातील कथित कटातील आरोपी उमर खालिद व शरजील इमाम यांचा जामीन अर्ज करकरडूमा न्यायालयाने फेटाळला. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला होता. सायंकाळी अतिरिक्त सत्र न्यायाधीश समीर बाजपेयी यांच्या न्यायालयाने दोन्ही आरोपींचा जामीन नाकारला. उमरच्या वतीने वकील त्रिदीप पैस आणि शरजीलच्या वतीने वकील मुस्तफा यांनी युक्तिवाद सादर केला.

त्यांच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, आम्हाला दीर्घकाळापासून कारागृहात



ठेवण्यात आले आहे, हे आमच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काचे उल्लंघन आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी आमचे जामीन अर्ज फेटाळले असले, तरी त्यानंतरच्या न्यायालयीन घडामोडींमुळे परिस्थितीत बदल आले आहेत. त्यांच्या या युक्तिवादांना विरोध करत दिल्ली पोलिसांनी न्यायालयात सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या खंडपीठाकडून वेगळा आदेश येत नाही, तोपर्यंत विद्यमान आदेश लागू राहील. त्यामुळे कनिष्ठ न्यायालयाला या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसून, कोणताही दिलासा किंवा स्पष्टीकरण हवे असल्यास आरोपींनी थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी.

## पेन्शन न मिळाल्याच्या संतापातून पोलिसांना बॉम्ब धमकीचे फोन

■ मुंबई

**बीएसएनएलमधून** निवृत्त झाल्यानंतर पेन्शनचे पैसे न मिळाल्याच्या रागातून मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला खोटे धमकीचे फोन करण्यात आला. या प्रकरणी ६५ वर्षीय व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, यापूर्वीही त्याने अशा प्रकारचे तब्बल ५१ फोन केल्याची माहिती पोलिसांनी दिली. ३ जुलै रोजी रात्री सुमारे ११ वाजता मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला एक निनावी फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने एका पोलीस ठाण्यात बॉम्ब ठेवला असल्याचे सांगत तातडीने फोन कट केला. मात्र कोणत्या पोलीस ठाण्यात बॉम्ब ठेवला आहे, याबाबत त्याने कोणतीही माहिती दिली नव्हती. यानंतर पोलिसांनी संबंधित मोबाईल क्रमांकाचे लोकेशन शोधले असता तो फोन चारकोप परिसरातील उत्तम नगर भागातून आल्याचे निष्पन्न झाले. सुमारे अर्ध्या तासानंतर त्याच क्रमांकावरून पुन्हा नियंत्रण कक्षाला फोन करण्यात आला. यावेळी मुंबई पोलीस आयुक्तालयात बॉम्ब ठेवल्याचा दावा करण्यात आला.

## वारंवार वीजपुरवठा खंडित मुरबाड शहरात पाणीटंचाई

■ मुरबाड

**मुरबाड** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शिरवली डॅम परिसरातील वीजपुरवठा सतत खंडित होत असल्याने शहराला पाणीपुरवठा करणारे व्यवस्थापन कोलमडत असल्याने नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

मुरबाड सबस्टेशन मधून या डॅम व परिसरातील गावांना वीजपुरवठा केला जातो. मुरबाड म्हसा मार्गावर मोठ्या प्रमाणात झाडे असल्याने पावसाळ्यात या झाडांची वाढ होऊन विद्युत वाहनांना लागत असल्याने या तारा तुटतात. त्यामुळे या परिसरात कायम वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार घडतो. याचा परिणाम शहरातील पाणीपुरवठा करताना होतो. त्यामुळे नियोजन डावलून पाणीपुरवठा केला जात आहे. दरवर्षी पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडतात. महावितरणने या जंगलातून जाणाऱ्या उघड्या ताराऐवजी केबल वापरल्यास वीजपुरवठा खंडित होणे थांबू शकते. परिणामी मुरबाड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत होऊन नागरिकांना सुविधा मिळेल. शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी महावितरण कंपनीने या उघड्या ताराऐवजी केबल वापरण्याची मागणी केली जात आहे.

## राज्यात रक्ताची मोठी टंचाई मुंबईत ८ दिवसांचाच रक्तसाठा

■ मुंबई

**सद्यस्थितीत** राज्यात सरासरी ८ दिवस आणि मुंबईत ५ दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा उपलब्ध असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. रक्ताच्या या मर्यादित साठ्यामुळे, विशेषतः थॅलेसेमियाच्या रुग्णांना विनाविलंब मोफत रक्त मिळण्यात अडचणी येत असून, त्यांची फरफट होत असल्याचे अहवालातून समोर आले आहे.

रक्तसाठ्याची ही गंभीर स्थिती सुधारण्यासाठी आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव, राज्य रक्त संक्रमण परिषदेने राज्यातील सर्व शासकीय व खासगी रक्तपेढ्यांच्या विशेष तपासणीचे आदेश दिले आहेत. या मोहिमेअंतर्गत रक्ताची

### रक्तदान करण्याचे परिषदेचे आवाहन

साठवणूक, कालबाह्य रक्त पिशव्यांची विल्हेवाट आणि ई-रक्तकोश प्रणालीवरील माहिती अद्ययावत असणे यावर करडी नजर ठेवली जात आहे. मुंबईत दररोज साधारण एक हजार युनिटपर्यंत रक्त रुग्णालयांमध्ये लागते व सध्या पाच दिवस पुरेल इतका रक्तसाठा असला तरी हा रक्ताचा तुटवडा मानण्यात येत आहे.

## लासलगाव कांदा बाजारपेठेचा विस्तार होणार! आता नवीन ११ शेड

### माल वाहतुकीला गती देण्याचा प्रयत्न

■ लासलगाव

**आशिया** खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव बाजार समितीमध्ये कांदा वाहतुकीला गती देण्यासाठी ११ नवीन गुड्स शेड उभारण्यात येत आहेत. वाढत्या माल वाहतुकीमुळे मध्य रेल्वेने केलेल्या वर्गीकरणात लासलगाव मालधक्क्याने थेट 'गट-१' मध्ये झेप घेतली आहे.

रेल्वेकडून दरवर्षी माल हाताळणीची क्षमता, कामकाजाची कार्यक्षमता आणि उपलब्ध सुविधांच्या आधारे गुड्स शेड्सचे वर्गीकरण केले जाते. यंदा ९५ गुड्स शेड्स पैकी ४२ गट-१, १२ गट-२ आणि ४१ गट-३ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या व्यवस्थेमुळे मालगाड्यांच्या वॅगनचा अनावश्यक थांबा कमी होऊन रेल्वेच्या पायाभूत सुविधांचा अधिक परिणामकारक वापर होणार आहे.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

निविदा सूचना क्रमांक : सीपीए - १६ - २०२६

खालील बाबींच्या पुरवठ्यासाठी दुहेरी लिफाफा पद्धतीद्वारा इलेक्ट्रॉनिक निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्रमांक | निविदा विवरण | निविदा विक्रीचा कालावधी |
|---|---|---|
| ३०००००७०२२४ | महानिर्मिती कंपनीच्या २५० मे. वॉ. युनिट-६ परळी औष्णिक विद्युत केंद्राकरिता एअर प्री-हीटर बास्केटच्या दोन पूर्ण संचांची खरेदी करणेबाबत. | २२/०७/२०२६ - ११.०० वाजे पर्यंत |

संपर्क तपशील: मुख्य अभियंता (म.ख.वि.) यांचे कार्यालय, दूरध्वनी क्र : ०२२-६९८५ ३६१७ / ३६१८

अधिक तपशिलाकरिता https://eprocurement.mahagenco.in/ या वेबसाईटला भेट द्या.

मुख्य अभियंता (म.ख.वि.)

## शारीरिक शिक्षण शिक्षकांचे ८ जुलैपासून धरणे आंदोलन

■ मुंबई

**राज्यात** गेल्या वीस वर्षांपासून शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या पदभरतीला शासनाने दुर्लक्ष केल्याने हजारो बी.पी.एड. व एम.पी.एड. पदवीधर बेरोजगार आहेत. या दीर्घकालीन अन्यायाविरोधात महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाने अखेर थेट लढाईचा बिगुल फुंकला असून, बुधवार ८ जुलै पासून मुंबईत आझाद मैदानात बेमुदत धरणे आंदोलन जाहीर केले आहे.

या बेमुदत धरणे आंदोलनासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने शारीरिक शिक्षण शिक्षक सहभागी होणार आहेत. हे बेमुदत धरणे आंदोलन पूर्णपणे शांततामय व कायदेशीर मार्गाने करण्यात येणार आहे.

## भिवंडी पालिकेच्या शोधमोहिमेत ७८ बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल

■ भिवंडी

**भिवंडी** शहरातील बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने हाती घेतलेल्या 'ऑपरेशन डिग्री चेक' मोहिमेत धक्कादायक माहिती समोर आली आहे. शहरातील ४५२ डॉक्टरांच्या शैक्षणिक पात्रतेची पडताळणी करण्यात आली असता तब्बल ७८ बोगस डॉक्टर आढळून आले आहेत. या सर्वांविरोधात पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. डॉक्टर दिनानिमित्त वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान होत असतानाच आरोग्य विभागाच्या तपासणी मोहिमेत एका बोगस डॉक्टरावर कारवाई करण्यात आली. राज्याच्या आरोग्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. नंदापूरकर यांनी भिवंडी महापालिकेच्या वैद्यकीय विभागाला भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. यानंतर शहरातील अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान पद्मानगर परिसरातील डॉ. मल्लेश गाजंगी हे ईलेक्ट्रोपॅथीचे डॉक्टर असूनही आवश्यक परवानगी नसताना ॲलोपॅथी पद्धतीने उपचार करत असल्याचे निदर्शनास आले.

## लोकलमध्ये प्रवाशाला धमकी गोवंडीतून एका अटक

■ मुंबई

**हार्बर** मार्गावरील गोवंडी-चेंबूरदरम्यान धावत्या लोकलमध्ये एक प्रवासी दुसऱ्या प्रवाशाला ठार मारण्याची धमकी देत असल्याच्या घटनेची ध्वनिचित्रफित समाज माध्यमावर प्रसारित झाली. या ध्वनिचित्रफितीची गंभीर दखल घेत रेल्वे पोलिसांनी प्रवाशाला ठार मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला अटक केली. या प्रकरणी गोवंडी येथे राहणारा सज्जाद फकीर मोहम्मद इब्राहिम कुरेशी उर्फ इल्ला (३६) याला अटक करण्यात आली.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई-निविदा सूचना क्र. २७/२०२६

खालील कामांसाठी म.औ.वि.महामंडळ नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद ई-निविदा मागवित आहे. सदर ई-निविदा (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | कोरी ई-निविदा उपलब्ध होण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| अ) | का.अ., मऔविम, कोल्हापूर विभागांतर्गत सातारा उपविभाग, सातारा. | | |
| १ | केसुर्डी खंडाळा औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.१... वनविभागाच्या हद्दीलगत भाग आराखडा क्र.२ मध्ये रस्ते, पाणी पुरवठा वितरण वाहिन्या व भाग आराखड्यास पोहोच रस्ते यासारख्या पायाभूत सुविधांचा विकास करणे. | ३,११,८६,०००/- | ०८/०७/२०२६ ते २३/०७/२०२६ |

नवाकाळ
Email- contact@navakal.in  www.navakal.in  /navakalofficial

# इंद्रायणी नदीच्या पात्रामध्ये साचले पांढरे शुभ्र फेसाचे थर

**भाविकांमधून तीव्र संताप**

■ आळंदी

**संत** ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याला चार दिवस उरले असतानाच पिंपरी-चिंचवड हद्दीतून सोडलेल्या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे आळंदीतील इंद्रायणी नदीपात्रावर फेसाचे थर साचले आहेत. यामुळे भाविकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.



पिंपरी - चिंचवडमधील कुदळवाडी, तळवडे आणि चिखली भागातील कारखान्यांचे प्रक्रिया न केलेले पाणी थेट नदीत सोडले जात आहे. मावळ भागातील काही गावातील सांडपाणी मिसळत असल्याने प्रदूषणात भर पडली आहे. त्यामुळे गुरुवारपासून नदीपात्रात कापसासारखा पांढरा शुभ्र फेस तरंगत असून, दुर्गंधीयुक्त पाण्यातच भाविकांना स्नान करावे लागत आहे. याचा फटका आळंदीसह चऱ्होली, धानोरे, गोलेगाव आणि मरकळ भागातील शेतीलाही बसत आहे. आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमधून मुद्दाम जलपर्णी आणि सांडपाणी सोडले जात असून, या प्रकरणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे लेखी तक्रार करण्यात येणार आहे.

# दादरमध्ये शिवसेना भवनासमोर अपघात! दुचाकीस्वार गंभीर जखमी

■ मुंबई

**मुंबईतील** दादर परिसरात शिवसेना भवनासमोर आज अपघात झाला. एका कारने दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. अपघातामुळे कारचेही मोठे नुकसान झाले असून, परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

शिवसेना भवनासमोरून जात असताना कारचालकाने दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. स्थानिक नागरिकांनी तातडीने जखमीला मदत करत उपचारासाठी रुग्णालयात हलवले. अपघातानंतर कारचालकाने घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला, पण नागरिकांनी त्याला पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले.

# राममंदिरात चोरी नव्हे दरोडा संजय राऊत यांचा घणाघात



■ मुंबई

**अयोध्येतील** राम मंदिरातील देणगी घोटाळ्याच्या निषेधार्थ उद्यापासून उबाठा राज्यव्यापी आंदोलन सुरू करणार आहे. या पार्श्वभूमीवर माध्यमांशी बोलताना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी भाजपावर हल्लाबोल केला. राम मंदिरात झाली ती किरकोळ चोरी नसून अनेकांचा सहभाग असलेला दरोडा आहे, हे सर्व चोर भाजपाशी संबंधित आहेत, अशी घणाघाती टीका राऊत यांनी केली.

पाच किंवा त्याहून जास्त जण सामिल असतील तर त्याला चोरी नव्हे दरोडा म्हणतात. राम मंदिरावर भाजपाच्या नतद्दष्टांनी दरोडा टाकला आहे. प्रभू रामचंद्रांची आभुषणे, मुकूट, गळ्यातला कंठहार लुटून नेला आहे. एवढेच नव्हे तर भरताने चौदा वर्षे ज्याची पूजा करत अयोध्येचा राज्यकारभार सांभाळला त्या पादुकाही चोरीला गेल्या आहेत. सीतामातेच्या कानातील कर्णफुले, गळ्यातला हार चोरला आहे. ही सर्व भाजपाचीच माणसे आहेत.

राम मंदिर ट्रस्ट हा एकट्या भाजपाचाच झाला आहे. ट्रस्टवर भाजपाने सगळे चोर एकत्र आणले आहेत. त्यामुळे आधी राम मंदिर ट्रस्ट बरखास्त केला पाहिजे आणि ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. कारण राम मंदिर एकट्या भाजपाचे नाही. लाखो रामभक्तांचे त्यामध्ये योगदान आहे. त्यामुळे ट्रस्ट हा सर्वपक्षीय असला पाहिजे, असे राऊत म्हणाले. उद्यापासून सुरू होणारे रामरक्षा आंदोलन हे एकट्या उबाठाचे नाही. ज्यांची ज्यांची प्रभू रामचंद्रांवर श्रद्धा आहे त्या सर्वांनी या आंदोलनात सहभागी झाले पाहिजे. काँग्रेस आणि आम आदमी पार्टीने राम मंदिर दरोड्याच्या निषेधार्थ ठिकठिकाणी आंदोलने सुरू केली आहेत.

# गडहिंग्लज-चंदगड मार्गावरील भडगाव पूल पाण्याने खचला

**कोल्हापूर- जिल्ह्यातील** गडहिंग्लज-चंदगड राज्य मार्गावरील हिरण्यकेशी नदीवर भडगाव येथील नवीन पुलाचे काम चालू असल्याने वाहतुकीकरिता पर्यायी पूल केला होता. परंतु नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढत चालल्यामुळे पर्यायी पुलाचा काही भाग खचल्याची घटना घडली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव पर्यायी पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. तसेच गडहिंग्लजकडून चंदगडकडे जाणारी वाहतूक आजरा गजरगाव मार्गे वळविण्यात आली आहे.पुलावरील रस्त्याचा काही भाग खचल्याने हा मार्ग धोकादायक बनल्याने ३ जुलै ते २१ जुलैपर्यंत हा मार्ग बंद करण्यात आला आहे. २८ जुलैपासून या पुलावरून हलक्या वाहनांची वाहतूक सुरू करण्याचे सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे नियोजन आहे. यासाठी पर्याय मार्ग गडहिंग्लज, गिजवणे, बेळगुंदी, इंचनाळ, गजरगाव, महागाव तसेच गडहिंग्लज, दुंडगे, जरळी, भडगाव तसेच गडहिंग्लज, गिजवणे, बेळगुंदी, इंचनाळ, हरळी खुर्द असा मार्ग धरावा - अशी माहिती सहाय्यक अभियंता - अमित पाटील यांनी दिली आहे.

# बीसीए प्रवेश हुकल्याच्या नैराश्यातून १८ वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

**पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद**

■ ठाणे

**उच्च** शिक्षणाचे स्वप्न अपूर्ण राहिल्याच्या नैराश्यातून कल्याणमधील १८ वर्षीय विद्यार्थिनी अक्षदा वाळवी हिने आत्महत्या केली. बीसीए (बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचा असताना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची मुदत संपल्याचे समजल्यानंतर तिने टोकाचे पाऊल उचलले. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अक्षदाने नुकतीच वाणिज्य शाखेतून बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली होती. पुढील शिक्षणासाठी तिला बीसीए अभ्यासक्रमात प्रवेश घ्यायचा होता. बारावीची परीक्षा संपल्यानंतर ती सुट्टीमध्ये आपल्या बहिणीसोबत नंदुरबार येथे मामाच्या गावी गेली होती. सुट्टी संपवून १४ जून रोजी ती कल्याणला परतल्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती घेत होती. तोपर्यंत ऑनलाईन प्रवेश पोर्टल बंद झाले होते. प्रवेशाची मुदत संपल्याचे समजताच तिला मोठा धक्का बसला. यावर्षी कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार नाही, या चिंतेतून ती तणावाखाली गेली होती. याच नैराश्यातून अक्षदाने घरात उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. काही वेळाने प्रकृती बिघडू लागल्यानंतर तिने स्वतः आईला विष प्राशन केल्याची माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीयांनी तिला तातडीने कल्याणमधील खासगी रुग्णालयात दाखल केले.

पुढील उपचारासाठी तिला मुंबईतील जे. जे. रुग्णालयात हलविण्यात आले. तब्बल दहा दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी कल्याणमधील खडकपाडा पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# अखेर नरिमन पॉईंट ते कफ परेड सागरी सेतू प्रकल्पाला पुन्हा गती

**मूळ खर्चाच्या दुपटीने थेट ५८८ कोटींचा खर्च**

■ मुंबई

**एमएमआरडीएने** नरिमन पॉईंट ते कफ परेड सागरी सेतू प्रकल्पाच्या कामाला तब्बल १७ वर्षांनंतर पुन्हा गती दिली असून, नव्याने पर्यावरण परवानग्यांसाठी प्रस्ताव दाखल केला आहे. हा १.८६ किमी लांबीचा सागरी पूल मंत्रालय परिसरातील वाहतूक कोंडी सोडवणार असून, यामुळे दोन्ही भागांमधील प्रवासाची वेळ २०-२५ मिनिटांवरून केवळ ५ मिनिटांवर येणार आहे.

दक्षिण मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी २००८ मध्ये पहिल्यांदा या १.६ किलोमीटर लांबीच्या सागरी सेतूचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. मात्र, प्रदीर्घ विलंबामुळे या प्रकल्पाचा बांधकाम खर्च आता मूळ २८४.५५ कोटी रुपयांवरून थेट ५८८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. सध्या नरिमन पॉईंट येथून कफ परेड, कुलाबा आणि नेव्ही नगर येथे जाण्यासाठी कॅप्टन प्रकाश पेठे, मादाम कामा रोड, वीर नरिमन रोड आणि महर्षी कर्वे रोड हे मार्ग आहेत. या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर वाहतूककोंडी होते. त्यातच भविष्यात मरिन ड्राईव्ह येथील पालिकेच्या कोस्टल रोडमुळे यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यातून मंत्रालय परिसर भागात कोंडी होण्याची भीती आहे. त्या पार्श्वभूमीवर नरिमन पॉईंट ते कफ परेड असा सागरी किनारा मार्ग उभारण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे.

# दिवंगत डॉ. वळसंगकर कुटुंबातील वाद विकोपाला! जावयानंतर सुनेवरही गुन्हा

■ सोलापूर

**सोलापुरातील** प्रसिद्ध दिवंगत मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या कुटुंबातील अंतर्गत वाद आणखी तीव्र झाला असून, संपत्ती आणि मालकीहक्काच्या संघर्षातून कुटुंबियांनी एकमेकांविरोधात पोलिसांत धाव घेतली आहे. काही दिवसांपूर्वी जावयाविरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर आता दिवंगत डॉक्टरांच्या सुनेविरोधातही पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या पत्नी डॉ. उमा वळसंगकर यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, १८ जून रोजी सून डॉ. शोनाली वळसंगकर यांनी दिवंगत डॉ. वळसंगकर यांच्या मालकीच्या 'एस. पी. न्युरो हॉस्पिटल'मध्ये जबरदस्तीने प्रवेश केला. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, त्यांना हॉस्पिटलमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला असता डॉ. शोनाली यांनी उपस्थित कर्मचारी आणि कुटुंबियांना अश्लील शिवीगाळ केली. तसेच दमदाटी करत परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी डॉ. शोनाली वळसंगकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या निधनानंतर त्यांच्या मागे असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या संपत्तीवर आणि 'एस. पी. न्युरो हॉस्पिटल'च्या मालकीहक्कावरून कुटुंबात वाद सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

# पाटणसईतील शेकडो एकर शेती ५ दिवस पाण्याखाली

**शेतातील राब कुजण्याची भीती**

■ रायगड

**रोहा** तालुक्यातील नागोठणे जवळील पाटणसई गावातील शेकडो एकर शेती मागील चार ते पाच दिवसांपासून पाण्याखाली गेली आहे. अंबा नदीवरील केटी बंधाऱ्याचे दरवाजे खुले केले नसल्याने मुसळधार पावसाचे पाणी पुढे वाहून न जाता शेतातच तुंबून राहिले आहे. त्यामुळे शेतातील राब कुजण्याची भीती निर्माण झाली आहे.

वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी अंबा नदीवरील केटी बंधाऱ्याचे दरवाजे खुले केले जातात. परंतु यंदा कोलाड पाटबंधारे विभागाच्या हलगर्जीपणामुळे हे दरवाजे काढले गेलेले नाहीत. विशेष म्हणजे पावसाळा तोंडावर असतानाच शेतकऱ्यांनी यासंदर्भात पाटबंधारे विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यांना कोणताच प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान, काल शुक्रवारी आमदार अनिकेत तटकरे यांच्या पाठपुराव्यामुळे यंत्रणेने खडबडून जागे होत हे दरवाजे काढण्याच्या कामाला सुरुवात केली. मात्र या पाण्यामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी माजी सभापती सदानंद गावकर यांनी केली आहे.

# एसआयआरच्या कामात हलगर्जीपणा सोलापुरात लिपिकावर गुन्हा दाखल

■ सोलापूर

**मतदार** यादी विशेष पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेच्या कामात हलगर्जीपणा, दिरंगाई आणि टाळाटाळ केल्याचा आरोप करत सोलापूर महापालिकेतील एका लिपिकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापूर महापालिकेत लिपिक म्हणून कार्यरत असलेल्या रविकिरण मधुकर ढाले यांच्याविरोधात ही कारवाई करण्यात आली आहे.

सध्या सोलापूर जिल्ह्यात मतदार यादी विशेष पुनरीक्षण प्रक्रिया सुरू असून, रविकिरण ढाले यांच्याकडेही या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. २७ जून रोजी त्यांना मतदारांना वाटप करण्यासाठी इन्युमरेशन फॉर्म स्वीकारून वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. संबंधित फॉर्म ताब्यात घेण्यास त्यांनी टाळाटाळ केल्याचा आरोप आहे. तसेच वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही त्यांनी प्रतिसाद दिला नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# जोगेश्वरीत मध्यरात्री टँकरच्या धडकेत डिलिव्हरी बॉयचा मृत्यू

■ मुंबई

**जोगेश्वरी** पश्चिम परिसरात मध्यरात्री भरधाव टँकरच्या धडकेत हर्ष या डिलिव्हरी बॉयचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालकाने वाहनासह पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत त्याचा पाठलाग करून काही अंतरावर पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी ओशिवरा पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

हर्ष ऑनलाईन डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत होता. मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास तो दुचाकीवरून जोगेश्वरी पश्चिमेतील अमृत नगर परिसरातील अजित ग्लास गार्डन गेटसमोरून जात होता. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या टँकरने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, हर्ष गंभीर जखमी झाला आणि त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघातानंतर टँकरचालकाने वाहनासह घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, परिसरातील काही नागरिकांनी त्याचा पाठलाग केला. काही अंतरावर टँकर अडवून चालकाला पकडले.

# भांडूप बेस्ट अपघातातील चालकावर सदोष मनुष्यवधाचा आरोप निश्चित



■ मुंबई

**गेल्या** वर्षी डिसेंबर महिन्यात भांडूप रेल्वे स्थानकाबाहेर बेदरकारपणे बस चालवून अपघात घडवल्याप्रकरणी बेस्टचा चालक संतोष सावंत याच्यावर सत्र न्यायालयात सदोष मनुष्यवधाचा आरोप निश्चित झाला आहे. या अपघात चार निष्पाप नागरिकांचा बळी गेला होता. तर १२ जण जखमी झाले होते.

आरोपी बसचालक सावंत याला काल तुरुंगातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी न्यायाधीशांनी सावंतवरील आरोप त्याला वाचून दाखवले. आता यासंबंधीची न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष सुनावणीला सुरुवात होणार आहे.

याबाबत भांडूप पोलीस स्थानकात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यानुसार हा अपघात २९ डिसेंबर २०२५ रोजी घडला. त्यावेळी आरोपी सावंत हा ६०६ क्रमांकाच्या मार्गावर बेस्टची नऊ मीटर लांबीची इलेक्ट्रिक बस चालवत होता. आरोपीचे वकील ॲड. देवेंद्र पाटील यांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की, त्याला इलेक्ट्रिक बस चालवण्याचे योग्य प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. सबब या घटनेकडे एक अपघात म्हणून पाहावे. तथापि, आरोपीचा जामीन अर्ज रद्द करताना न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते की, आपल्याला इलेक्ट्रिक बस चालवण्याचे योग्य प्रशिक्षण देण्यात आले नव्हते याची पूर्ण कल्पना आरोपीला होती. आपल्याला इलेक्ट्रिक बस चालवण्याचे तंत्र अवगत नसतानाही दुर्घटना होण्याच्या शक्यतेकडे साफ डोळेझाक करत त्याने बस चालवली.

# साकीनाका मॅनहोल मृत्यू प्रकरणात कंत्राटदार फरार! ३ मजूर ताब्यात

■ मुंबई

**अंधेरीतील** साकीनाका येथे उघड्या मॅनहोलमध्ये पडून ५५ वर्षीय अस्लम इसाक शेख यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पोलिसांनी कंत्राटदारासह घटनास्थळी काम करणाऱ्या मजुरांविरोधात गुन्हा दाखल केला. या प्रकरणात तीन मजुरांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून, मुख्य कंत्राटदार अद्याप फरार आहे. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना केली आहेत. प्राथमिक तपासात घटनास्थळी कोणतेही बॅरिकेड्स किंवा इशारा फलक नव्हते. याशिवाय संबंधित कंत्राटदाराला त्या ठिकाणी कामासाठी अधिकृत परवानगी होती का? याचाही तपास सुरू आहे. खैरानी रोडवर १ जुलैला मुसळधार पावसादरम्यान अस्लम शेख हे कामावरून घरी परतत असताना उघड्या मॅनहोलमध्ये पडले. पाण्याचा प्रवाह प्रचंड असल्याने ते वाहून गेले. मुंबई अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि इतर यंत्रणांनी रात्रभर शोधमोहीम राबवली.

# दोडामार्गच्या आडाळीतील गोल्फ कोर्स प्रकल्प अखेर रद्द

**एमआयडीसीतील भूखंड वाटप प्रक्रिया पुन्हा सुरू**

■ दोडामार्ग

**स्थानिक** नागरिकांनी जोरदार विरोध केल्यामुळे आडाळी एमआयडीसीमधील प्रस्तावित गोल्फ कोर्स प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. तसेच भूखंड वितरण प्रक्रियेवरील स्थगिती उठवण्याचा आदेशही यावेळी उद्योग मंत्री सामंत यांनी दिला. आडाळी येथील एमआयडीसीमधील भूखंड वाटप, प्रलंबित उद्योग सुरू करणे आणि इतर समस्यांसाठी आमदार दीपक केसरकर यांच्या मागणीवरून विधान भवनात ही बैठक झाली. मंत्री सामंत हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत उद्योजकांना भूखंडांचा ताबा देणे, करार करणे आणि बांधकाम परवानगी देणे यावरील स्थगिती उठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्याचप्रमाणे नवीन इच्छुक उद्योजकांसाठी भूखंड उपलब्ध करून देण्यासाठी पुढील दोन आठवड्यांत ऑनलाईन प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

नवोदित उद्योजकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले, परिसरातील प्रस्तावित गोल्फ कोर्स प्रकल्प रद्द करण्याचा निर्णयही झाला. या भागात औद्योगिक गुंतवणूक वाढावी आणि मोठे उद्योजक आकर्षित व्हावेत, यासाठी येत्या ऑगस्टमध्ये गोवा येथे एक विशेष गुंतवणूक परिषद घेण्याचे निश्चित करण्यात आले.

# वाशिममध्ये कार-टिप्परची धडक! दोघांचा जागीच मृत्यू

■ वाशिम

**वाशिम** जिल्ह्यातील कारंजा-मानोरा मार्गावरील कुपटा घाटात आज सकाळी अपघात झाला. कार आणि टिप्पर यांच्यात झालेल्या धडकेत कारमधील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की, कारच्या समोरील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला.

आज सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. कार कुपटा येथून मानोराच्या दिशेने जात असताना घाट परिसरात समोरून येणाऱ्या भरधाव टिप्परने तिला जोरदार धडक दिली. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी झाली. मृतदेह पुढील प्रक्रियेसाठी मानोरा येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा केला.

# महायुतीत 'शिवसंग्राम'ला दुय्यम वागणूक! ज्योती मेटेंचा आरोप



■ बीड

**शिवसंग्राम** पक्षाचे संस्थापक दिवंगत विनायक मेटे यांच्या निधनानंतर महायुतीमध्ये पक्षाला दुय्यम वागणूक दिली जात असल्याचा गंभीर आरोप शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे यांनी केला आहे. विनायक मेटे यांच्या हयातीत महायुतीत पक्षाला मिळणारा सन्मान आणि राजकीय वाटा आता मिळत नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आणि नाराजी वाढत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

याबाबत ज्योती मेटे म्हणाल्या की, महायुतीचा एक प्रामाणिक घटक पक्ष म्हणून शिवसंग्रामने राज्यभरातील महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये शक्य त्या ठिकाणी भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत समन्वयाने काम केले. एवढे सहकार्य करूनही सध्या पक्षाच्या वाट्याला उपेक्षा येत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांना राजकीय प्रवाहात स्थिरस्थावर करण्यासाठी महायुतीने पक्षाला सन्मानजनक स्थान दिले पाहिजे.

याबाबतची खंत आम्ही स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरही व्यक्त केली आहे. महायुतीने वेळेत योग्य राजकीय वाटा देण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर कार्यकर्त्यांमधील नाराजी अधिक तीव्र होईल आणि त्यांच्या संतापाला आवर घालणे कठीण जाईल.

# वर्ध्याच्या गोरस भांडारवरील कारवाई एफडीएने मागे घेतली

■ नागपूर

**वर्धा** जिल्ह्यातील प्रसिद्ध गोरस भांडार प्रकरणात तुकाराम मुंढे हे आयुक्त असलेल्या अन्न व औषध प्रशासन आणि राज्य सरकारला मोठा धक्का बसला आहे. एफडीएने केलेल्या एका कारवाईविरोधात दाखल याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. न्यायालयाने फटकारल्यानंतर एफडीएने वर्ध्यात १९३१ पासून कार्यरत असलेल्या गोरस भांडार या दुग्धव्यवसाय संस्थेवर एफडीएने ३१ मे रोजी छापा टाकला होता. तपासणीदरम्यान उत्पादन केंद्रात अस्वच्छ वातावरण असल्याचा दावा करत गाईचे दूध, तूप, ताक आणि खवा यांसह सुमारे २५.८६ लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

# विरार-अलिबाग रस्ता प्रकल्पाच्या कामाला वेग! जागेचा अडथळा दूर

**वनविभागाला बदल्यात देणार ३० हेक्टर जागा**

■ मुंबई

**विरार-अलिबाग** एकात्मिक वाहतूक मार्ग प्रकल्पाच्या कामाला वेग आला असून, वन जमिनीचा मुख्य अडथळा दूर झाला आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील ३० हेक्टर शासकीय जमीन वनविभागाकडे हस्तांतरित करण्यास मंजुरी मिळाली आहे. 'एमएसआरडीसी'च्या या प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनासाठी २२ हजार २५० कोटींच्या कर्जाला देखील राज्य सरकारने मंजुरी दिली आहे.

विरार ते अलिबाग वाहतूक मार्गिका या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला हुडको या वित्तीय संस्थेकडून उभारण्यात येणाऱ्या २२ हजार २५० कोटींच्या कर्जास वित्त विभागाच्या अटीस अधीन राहून शासन हमी देण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने २६ जून २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मागणीनुसार हुडकोकडून प्रस्तावित व्याजाचा दर कर्ज घेण्याच्या वास्तविक दिनांकावर अवलंबून असणार आहे. कर्ज घेताना रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित बँक दराचा विचार करून, त्यानुसार व्याजाचा दर कमीत कमी निश्चित करण्याबाबतची कार्यवाही करावी. कर्जाचा मुदत कालावधी १५ वर्षांचा असणार आहे. विधी व न्याय विभागाने विहित केलेल्या नमुन्यात शासन हमी करारनामा करण्यात यावा, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# खारे पाणी गोडे करण्याचा मनोरी प्रकल्प चार वर्षांत पूर्ण करणार


**मंत्री उदय सामंत यांची विधानसभेत माहिती**

■ मुंबई

**मुंबईची** वाढती पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी आणि पावसावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मनोरी येथे समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला असून, हा प्रकल्प येत्या ४ वर्षांत पूर्ण केला जाईल, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

यासंदर्भात समाजवादी पक्षाचे अबू आझमी यांनी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना सामंत यांनी सांगितले की, निःक्षारीकरण प्रकल्पामळे मुंबईला अतिरिक्त २०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. मुंबईला विविध सात धरणांमधून दररोज सुमारे ४ हजार १०० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा केला जात असला तरी शहराची एकूण गरज ४ हजार ६६५ दशलक्ष लीटर इतकी आहे. खारे पाणी गोडे करण्याच्या या प्रकल्पाच्या बांधकामाची किंमत ४ हजार ७७ कोटी रुपये असून, त्यामध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

# नवाकाळ शब्दकोडे-१६५७



**आडवे शब्द –**

१. धीर सुटलेला, हतबल ५. संपर्क, उपाययोजना ७. मित्र, सहचर ९. शासनाला करातून मिळणारे उत्पन्न १२. तामिळनाडूतल्या बैलांच्या प्रसिद्ध शर्यती २३. संत ज्ञानेश्वरांना भेटायला जाताना वाघावर बसून जाणारा योगी १४. छातीत होणारी धडधड १६. उपाय, तुलना, पर्याय १७. भाक, आण १८. अणकुचीदार २०. कोल्हापूरचा गड २३. निरोप्या, दूत २५. अनुरूप २७. मुलखावेगळा, इतरांहून अलग २९. रेती ३०. अडचण, पंचाईत ३१. साडीचा पदर ३२. सभा ३३. मराठीची एक लिपी ३४. मेलेला ३५. तलवारीहून छोटे दुधारी शस्त्र ३६. बाजूबंद ३७. उग्र वास ३८. गोंगाट ४०. सैन्याचा प्रमुख ४१. गोधडी, वाकळ ४२. शीघ्र गतीने ४४. चारचौघांहून अलग, नामी ४७. नामस्मरण ४९. जास्तीत जास्त ५०. किरकोळ रकमेची लाच ५२. बायको ५३. सेतू ५४. सहदेवचा सख्खा भाऊ ५६. वाहतूक ५८. घाव ६०. पारतंत्र्य ६१अ. ताम्र ६२. अर्जुन ६३. शासकीय ६५. पुढ्यात असलेली ६७. गणपती ६८. शोले सिनेमात जयचा जोडीदार ७०. भिंतीवर चालणारा किळसवाणा प्राणी ७२. समुद्राच्या लाटांचा आवाज ७३. मजा, मौज ७४. डोळ्यांच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण ७६. हेळसांड, दुर्लक्ष ७८. जल्लोष ७९. फळांची करंडी ८०. स्थान ८१. नवरदेव ८२. चकित ८३. बारा राशीतील एक ८५. दहावे नक्षत्र ८६. मैत्रीण, एक मराठी नटी ८७. चिन्ह ८८. खोगीर ८९. शाईच्या लेखणीचा जुना प्रकार ९१. सलगी ९२. पतंगाचा धारदार दोरा ९३. अपत्य ९४. काटकोन त्रिकोणाची सर्वात मोठी बाजू ९५. फणसाचा प्रकार ९६. अतिथी ९८. घोडा, वारू ९९. प्रथम १०१. प्रामाणिक, खरा १०२. चांदी १०३. रास १०४. मोहरी १०५. अत्यंत जास्त १०६. ताकाचे पूर्वरूप १०७. बेशिस्त

**उभे शब्द –**

१. सांप्रत २. सुगंधी तांदळाची जात ३. लुब्ध ४. झेंगट ५. निरोप, बंगाली मिठाई ६. धावण्याच्या स्पर्धेतला क्रीडापटू ७. सुकुमार, कोमल ८. भ्रष्ट १०. वारंवार मूळपदावर येणारी गोष्ट ११. लाभणारे, प्राप्य १२. एक त्रासदायक वनस्पती, जलकुंभी, वॉटर हायसिंथ १५. मोठी वाटी १६. उपाय १९. फुलातील पराग २१. गणपती २२. अतिशय कष्ट २३. सावकाश २४. पार्वती २६. रामाचे स्तोत्र २८. गावाची सीमा २९. छोटी वस्ती ३१. खिसेकापू ३३. धरबंद नसलेला, बेलगाम ३४. हिमाचल प्रदेशातील थंड हवेचे पर्यटनस्थळ ३६. वाचणारा ३९. अस्थिर स्वभावाचा, चंचल ४१. कापरे ४३. भांडखोर ४४. आक्रमण ४६. शंकराचे एक नाव ४७. पाण्यात राहणारी कविकल्पनेतील सुंदरी ४८. माहुताचे आयुध ५०. कुंकवाची आडवी रेघ ५१. काटकसर ५४. पती, यजमान ५५. वेलींचा मांडव ५७. गुलामी ५८. बोलबच्चन, वाचाळ ५९. द्वाररक्षक, पहारेकरी ६१. गुद्दा ६२. सह, बरोबर ६४. आदला दिवस ६६. पेठ, आळी ६७. मादक, नशा आणणारे ६९. सुंदर स्त्री ७१. विकत घेणे ७२. गवई ७३. फसवणे, लुबाडणे ७४. घोडे बांधायची जागा ७५. भयभीत, भ्यालेला ७६. अधिकार ७७. जाणे ७८. कागदाचा बारीक तुकडा ८०. गजऱ्यातले सुगंधी फूल ८२. लेप ८४. हिंसाचार ८६. प्रारब्धदेवता ८७. युरेनस ग्रह ८८. फाटलेले ९०. ललाट ९४. अपक्व ९५. नेत्रांजन ९७. अग्नीला अर्पण केलेले १००. थंडी १०१. स्वाक्षरी १०२. पृथ्वी •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६५६ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. गवत ३. इरसाल ६. भंगुर ८. कसाबसा ११. रममाण १३. गेह १५. रेलचेल १७. मरणोत्तर १९. जाचक २०. छकडा २२. गठ्ठा २३. वपा २४. तगारी २६. नाकबूल २८. मदमस्त ३०. बेकायदा ३२. पकड ३३. मदन ३५. वजनदार ३८. कलिका ४०. गर्दी ४१. गाव ४२. गालिचा ४४. वावगे ४५. सारीपाट ४८. डबलबी ५२. नशा ५३. भपका ५६. जत्रा ५७. अलीबाबा ५९. हीन ६१. कलश ६३. खोक ६४. यजन ६५. पक्व ६६. खवचट ६७. करंडी ६९. उमग ७०. पीडा ७१. गरे ७२. क्षमा ७४. नासा ७५. रमल ७८. लता ८१. कलावती ८३. साधू ८५. सवत ८६. बडगा ८७. धड ८८. लीनता ९०. पखालपार्वती ९२. आड ९३. डहाळी ९४. तेजस्वी ९५. पय ९७. तोय ९८. गड ९९. दुरावा १००. गार १०२. भोळा सांब १०५. खोपा १०६. यादी १०७. सुरवंट १०९. मामा ११०. सटरफटर १११. मेधा ११२. सरबराई

**उभे शब्द :** १. गनीम २. तरणोपाय ३. इमारत ४. रण ५. लगेच ७. गुलछबू ८. कल ९. साचेबंद १०. बल १२. मत्त १४. हकनाक १५. रेडा १६. मठ्ठा १८. रवका १९. जारी २१. कलमकारी २२. गस्त २५. गायन २७. कडक २८. मनगटशाही २९. मध्य ३०. बेलगाम ३१. दाव ३२. परवड ३४. नवशिका ३६. जहाल ३७. दावा ३९. लिसा ४३. चाड ४६. पान ४७. शुंभ ४९. बडा ५०. बीजक ५१. मलीन ५४. परिचय ५५. सैल ५७. अजगर ५८. बापडा ६०. नखरेल ६१. कटाक्ष ६२. शक ६३. खोडी ६४. यम ६८. रंगावली ६९. उसासा ७०. पील ७३. माकडहाड ७६. महालय ७७. नवती ७९. ताबडतोब ८०. उगाच ८२. तीनतेरा ८४. धूप ८५. सर्वत्र ८७. धडगत ८९. ताजवा ९१. खापर ९६. सोळा ९९. दुपार १००. गादी १०१. खूर १०२. भोट १०३. सांबार १०४. कमाई १०५. खोट १०६. यार १०७. सुधा १०८. वंद्य १०९. मारा

# राशिभविष्य

**रविवार ५/०७/२०२६ ते शनिवार ११/०७/२०२६**




## • मेष

**संमिश्र** ग्रहमान असलेला हा आठवडा आहे. आठवड्याची सुरुवात सकारात्मक होईल. तुमच्यामधील ऊर्जेला योग्य दिशा दिल्यास तुमचे उद्दिष्ट पार पाडता येईल. आर्थिक बाबतीत कुठल्याही मोहाला बळी पडू नका. खर्चावर, बोलण्यावर नियंत्रण ठेवा. सध्या एकंदरीत ग्रहमान बघता प्रत्येक पाऊल सावधगिरीने उचलावे लागेल. संयम राखणे म हत्त्वाचे आहे. अपेक्षित यश मिळाले नाही तरी प्रयत्न चालू ठेवावेत. घाईघाईने कुठलेही निर्णय घेऊ नका.

घरामध्ये वातावरण सर्वसाधारण राहील. कौटुंबिक खर्चाचे नियोजन करताना अनपेक्षित खर्चाची तरतूद करून ठेवावी. धार्मिक कार्य समाधान देईल. तुमच्या बोलण्यामुळे विनाकारण वादविवाद होऊ शकतात. काळजी घ्यावी. जोडीदार व संततीशी चर्चा करूनच घरगुती निर्णय घ्या.

कार्यक्षेत्रामध्ये नव्या योजना प्रत्यक्षात आणता येतील. मात्र त्यासाठी अडथळे पार करावे लागतील. आर्थिक पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी काळजी घ्या. नोकरदारांना वरिष्ठांचे सहकार्य फारसे मिळणार नाही. तुमच्या कार्यशैलीमध्ये बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करावे लागतील. आरोग्याची काळजी घ्या.

**शुभ दिनांक :** ५, ६, ९.

## • वृषभ

**संयम** व नियम पाळून कृती केल्यास हा आठवडा चांगला जाईल. आठवड्याच्या सुरुवातीला अनपेक्षितपणे जबाबदारी वाढेल. ती तुम्ही योग्य रीतीने पार पाडाल. प्रत्येक निर्णय स्थिर मनाने घ्यावा. तुमच्या नवीन कल्पना, योजना समोरच्याला नीट समजावून सांगा. आर्थिक आवक व जावक सारखीच असेल. आधी केलेल्या कामाचे पैसे आत्ता मिळतील. मात्र वर्तमानातील येणी वसूल करण्यासाठी संयम दाखवावा लागेल. बोलताना योग्य व सौम्य शब्दांचा वापर करा.

घरामध्ये जबाबदारी पार पाडताना आक्रमकता, हट्टीपणा नियंत्रणात ठेवा. कामानिमित्त प्रवासाचे योग असल्यामुळे कुटुंबासाठी आवर्जून वेळ काढावा लागेल. जोडीदाराशी मतभेद होतील. सुसंवाद ठेवावा. संततीकडे आवर्जून लक्ष ठेवावे लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन संधी समोर दिसेल, पण प्रत्यक्षात तिचा वापर करताना सावधगिरी बाळगा. कागदपत्रांची काळजी घ्यावी. आर्थिक व्यवहार तज्ज्ञ व्यक्तीच्या सल्ल्याने करावेत. मनामधील धाडसी विचारांना व्यावहारिकतेची जोड आवश्यक द्यावी. नोकरदारांना स्वतःची क्षमता सिद्ध करता येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल.

**शुभ दिनांक :** ५, ७, ८.

## • मिथुन

**आठवड्याचा** मध्य तुमच्यासाठी चांगला ठरेल. राशी स्वामी बुध वक्री असणार आहे. नियोजित कार्याची पूर्ण माहिती घेऊन स्थिर मनाने निर्णय घ्यावा. तुमच्याकडून परिस्थितीचा अंदाज चुकण्याची शक्यता आहे. सावध राहावे. बंडखोरीचे, अतिधाडसाचे विचार नियंत्रणात ठेवा. बोलताना काळजी घ्यावी. आर्थिक आवक चांगली असली तरीही खर्च वाढणार आहे. अनपेक्षित व अचानक खर्च होऊ शकतो. स्वतःची क्षमता ओळखून त्याप्रमाणेच पावले उचला.

कुटुंबामध्ये मतभेद झाले तरी सुसंवादाने मार्ग निघेल. कुटुंबाची साथ मिळेल. जोडीदाराचे मत, सल्ला विचारात घ्या. घरामध्ये शिस्तीचे वातावरण राहील. मित्रपरिवार तसेच भावंडांशी मतभेदाचे मुद्दे टाळावेत. कार्यक्षेत्रामध्ये नवीन ओळखींपासून लाभ होताना दिसले तरीही सावधगिरी बाळगणे योग्य ठरेल. नोकरीव्यवसायात काही बदल होऊ शकतो. महत्त्वाचे निर्णय घेताना व्यवहारी दृष्टिकोन ठेवा. स्पर्धात्मक परिस्थितीला तोंड द्यावे लागेल.

आरोग्याच्या तक्रारींकडे वेळीच लक्ष द्यावे. पोटाच्या तक्रारी वाढतील.

**शुभ दिनांक :** ७, ८, ९.

## • कर्क

**आठवड्याची** सुरुवात अडथळ्याने झाली तरी उत्तरार्ध मात्र तुमच्यासाठी चांगला ठरणार आहे. तुमच्या मनशक्तीचा या आठवड्यात कस लागणार आहे. कल्पनाविश्वात न रमता नियोजन करून प्रत्यक्ष कृतीला महत्त्व द्यावे. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. खर्चावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. कर्जप्रकरणे असल्यास मार्गी लागतील.

कुटुंबासाठी पैशाची तरतूद करून ठेवावी. जोडीदाराशी सुसंवाद राहील. संततीशी मात्र जुळवून घ्यावे लागेल. मित्रांशी विनाकारण होणारे मतभेद टाळावेत. भावंडांना मदत करावी लागेल. कुठलाही व्यवहार करताना व्यवहार विसरू नका. भावनेच्या भरात घेतलेले निर्णय पुढे त्रासदायक ठरतील. कार्यक्षेत्रामध्ये सकारात्मक विचार उपयुक्त ठरतील. तुमच्याकडून चुका होणार नाहीत यासाठी सावध राहावे. नवीन योजना प्रत्यक्षात आणण्यापूर्वी त्याची पूर्ण माहिती घेणे आवश्यक ठरेल. यासाठी अनुभवी व ज्येष्ठ व्यक्तीचे सहकार्य तुम्हाला मिळेल. नोकरदारांना स्वतःची क्षमता, कौशल्य सिद्ध करता येईल. तुमची प्रतिष्ठा वाढेल. वरिष्ठांचे सहकार्य गृहीत धरू नका.

**शुभ दिनांक :** ८, ९, ११.

## • सिंह

**आठवड्याची** सुरुवात व अखेर चांगली होणार आहे. मधल्या काळात कष्ट वाढतील. आळशीपणा सोडून प्रत्यक्ष कृती करणे व ती योग्य वेळेत करणे याला महत्त्व द्या. ग्रहमानाचा विचार करता विरोधक सक्रिय होणार आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही संयमाने मार्ग काढणे तुम्हाला जमू शकेल. आर्थिक स्थितीचा समतोल राखण्यासाठी अनावश्यक खर्च टाळावेत. आर्थिक गुंतवणूक दीर्घ मुदतीसाठी करावी. बोलताना काळजी घ्या. चुकीच्या बोलण्यामुळे नुकसान होऊ शकते.

घरामध्ये विनाकारण संघर्ष होऊ शकतो. चर्चेने समस्येवर तोडगा काढा. सर्वांना बरोबर घेऊन निर्णय घ्यावेत. संततीसाठी तसेच कुटुंबाच्या खर्चामध्ये वाढ होईल. कार्यक्षेत्र व कौटुंबिक आघाडी सांभाळताना तारांबळ होणार आहे.

कार्यक्षेत्रामध्ये प्रतिकूलतेचा सामना करत पुढे जावे लागेल. छुपे स्पर्धक, विरोधक कार्यरत होतील. तुमच्या योजना, नवीन विचार, कार्यशैली वेळेआधी उघड करू नका. नोकरदारांच्या कष्टामध्ये वाढ झाली तरी त्याचे चीज होईल. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना त्रास होऊ शकतो.

**शुभ दिनांक :** ५, ६, ११.

## • कन्या

**तुमच्या** कष्टाला, प्रयत्नांना भाग्याची साथ मिळणार आहे. आठवड्याचा पूर्वार्ध महत्त्वाच्या कामांसाठी चांगला ठरेल. मानसिक दडपण जाणवेल. द्विधा मनस्थिती निर्णय घेण्यास उशीर करेल. कामाची गती वाढवावी लागणार आहे. आवश्यक असल्यास तज्ज्ञ व्यक्तीचा सल्ला जरूर घ्या. आर्थिक स्थिती चांगली राहील. मात्र नवीन आर्थिक गुंतवणूक सध्या टाळावी. घरापासून कामानिमित्त लांब जावे लागेल. कौटुंबिक जबाबदारी तरीही पूर्ण करा. जोडीदार व संततीची प्रगती समाधानकारक राहील. घरामध्ये शिस्तीचे परंतु उत्साही वातावरण राहील. अविवाहितांचे विवाह जमतील.

कार्यक्षेत्रामध्ये दुसऱ्यांकडून काम करून घेण्याबरोबरच स्वतःलाही प्रत्यक्ष मैदानात उतरावे लागेल. सुनियोजित व अभ्यासपूर्ण धाडस योग्य ठरेल. सामाजिक व सरकारी कामांसाठी योग्य काळ आहे. तुमची प्रतिष्ठा मात्र जपा. स्पर्धात्मक परिस्थिती व हितशत्रूंचे डावपेच ओळखावे लागतील. त्याप्रमाणेच तुमचे लवचिक धोरण ठेवा. मानसिक आरोग्य सांभाळावे.

**शुभ दिनांक :** ५, ७, ८.

## • तूळ

**आठवड्याची** सुरुवात मनामध्ये गोंधळ निर्माण करणारी राहील. कामाचे प्राधान्य ठरवून त्यावरच लक्ष केंद्रित करा. साधक बाधक विचार करून निर्णय घ्यावा लागेल. आव्हाने समोर असली तरी संयमाने व चिकाटीने त्याला तोंड द्यावे. व्यवहारामध्ये नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. आर्थिक लाभ चांगले होतील. परंतु गुंतवणूक करताना पूर्ण सावधगिरी बाळगावी. शक्य झाल्यास गुंतवणूक पुढे ढकला. आठवड्याच्या शेवटी मनामध्ये विनाकारण भीती निर्माण होईल. काळजी घ्या.

कुटुंबाच्या प्रगतीसाठी काही व व्यावहारिक निर्णय घ्यावे लागतील. त्यामुळे मतभेद व संघर्षाला तोंड द्यावे लागेल. आत्ता त्रासदायक स्थिती असली तरी भविष्यात याचा फायदा होईल. वडिलोपार्जित संपत्तीचे प्रश्न पुढे येतील. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्या.

उद्योगव्यवसायात नवीन योजना प्रत्यक्षात म्हणता येतील. आर्थिक व्यवहार करताना कागदपत्रांची तसेच त्यातील नियमांची तज्ज्ञांकडून तपासणी जरूर करा. कायदेशीर बाबी दुर्लक्षित करू नयेत. नोकरदारांना त्यांच्या कामाचे श्रेय मिळेल. भागीदारीतील व्यवसाय असल्यास पारदर्शक व्यवहार अत्यावश्यक राहील. वैचारिक मतभेदांची शक्यता आहे.

**शुभ दिनांक :** ७, ८, ९.

## • वृश्चिक

**आठवड्याचा** उत्तरार्ध चांगला ठरेल. सुरुवातीला मनामध्ये अनामिक भीती, अस्वस्थता जाणवेल. त्यावर मात करून उत्साही मनाने कामाचे योग्य नियोजन करा. गोचर गुरुचे कर्क राशीतील भ्रमण तुमच्यासाठी शुभ आहे. तुमचा राशीस्वामी मंगळ तुम्हाला ऊर्जा देईल. तुमच्यातील जिद्द व लढाऊ वृत्तीचा उपयोग करा. मात्र बोलण्यावर व बंडखोर वृत्तीवर नियंत्रण ठेवा. आर्थिक स्थिती चांगली राहण्यासाठी खर्चावर नियंत्रण ठेवावे. आर्थिक गुंतवणूक छोट्या प्रमाणात व दीर्घ मुदतीसाठी करा.

कौटुंबिक आघाडी चांगली आहे. कुठेही गैरसमज होणार नाहीत याची मात्र काळजी घ्यावी. जुन्या काही समस्या असल्यास आता त्या सोडवता येतील. तुमच्या प्रयत्नांना भाग्याची व कुटुंबाची साथ राहील. जोडीदार व संतती यांचे पूर्ण सहकार्य राहील. कार्यक्षेत्रामध्ये प्रतिस्पर्ध्यांवर मात करता येईल. विरोधक, हितशत्रू त्यांचा अडथळा दूर करू शकाल. रखडलेली कामे पूर्ण करता येतील. नोकरदारांना त्यांच्यातील वेगळेपण, कार्यकुशलता सिद्ध करता येईल. कामामध्ये सातत्य ठेवावे.

आरोग्याच्या छोट्या तक्रारींकडेही वेळीच लक्ष द्या.

**शुभ दिनांक :** ९, ११.

## • धनु

**आठवड्याची** सुरुवात व अखेर चांगली असेल. सध्याचे तुमचे ग्रहमान बघता अनामिक भीती, निराशा वाटण्याची शक्यता आहे. मात्र त्यावर मात करून पुढे वाटचाल केल्यास यश नक्की मिळेल. चिकाटीने व उत्साही मनाने नियोजित कार्य करावे. मनातील तुम्ही ठरवलेल्या गोष्टींमध्ये अनपेक्षित अडचणी आल्या तरी त्यावर मात करायची क्षमता तुमच्यामध्ये नक्की असणार आहे. कर्माला भाग्याची साथ राहील. आर्थिक नियोजनाला महत्त्व द्यावे. गुंतवणूक करताना विशेष खबरदारी घ्यावी लागेल. नवीन संधी, लाभ प्रयत्नाने मिळवावे लागतील व त्यात तुम्ही यशस्वी व्हाल. परिस्थितीनुसार कामाची पद्धत बदलण्याची तयारी ठेवा. स्वतःकडे दुर्लक्ष करू नका. तुम्हाला जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. जोडीदार व मुले यांचे हट्ट पूर्ण करावे लागतील. घरातील ज्येष्ठांची काळजी घ्या. मित्रपरिवार काही प्रमाणात साथ देतील.

कार्यक्षेत्रामध्ये महत्त्वाच्या कामांना प्राथमिकता देऊन त्यावर लक्ष केंद्रित करा. विरोधकांशी जशास तसे वागावे लागेल. गती वाढवण्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन पुढे जावे. कार्यशैलीमध्ये जुन्याबरोबरच नवीन, आधुनिक तंत्रज्ञान वापरणे उपयुक्त ठरणार आहे.

पोटाच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक :** ५, ६, ११.

## • मकर

**स्वत:वर** विश्वास ठेवून सकारात्मक विचाराने पुढे चला. मनामध्ये येणारे अनेक विचार त्रासदायक ठरतील. त्यामुळे उद्दिष्ट नक्की करून त्यावरच लक्ष केंद्रित करावे. आर्थिक नियोजन व गुंतवणूक तज्ज्ञांच्या सल्ल्याने व सावधगिरीने करावी. सध्या तुमचे विचार लोकांना इतरांना पटतीलच असे नाही. बोलताना काळजी घ्या. आक्रमकता व धाडसीपणा योग्य ठिकाणीच दाखवा.

कुटुंबामध्ये अचानक व अनपेक्षित समस्या येऊ शकतात. संयम दाखवून इतरांच्या सहकार्याने त्यातून मार्ग निघेल. मुले, जोडीदार व तुमच्यामध्ये वैचारिक मतभेद झाले तरी योग्य तो समन्वय साधता येणार आहे. अविवाहितांच्या विवाहासंबंधित बोलणी पुढे सरकतील.

उद्योगव्यवसायात नवीन योजना कार्यरत करता येतील. सहकारी, नवीन व्यक्ती यांची योग्य पारख करावी. आर्थिक गुंतवणूक अत्यंत सावधगिरीने करा. अचानक येणाऱ्या अडचणी, ताणतणाव संयमाने हाताळता येतील. नोकरदारांनी बुद्धी चातुर्याने हितशत्रूंवर मात करावी.

ॲलर्जी, श्वसनविकारांकडे लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** ७, ८.

## • कुंभ

**आठवड्याची** सुरुवात चांगली होणार असली तरी मनामध्ये थोडा संभ्रम वाढवणारी ठरेल. गुरुचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत. विश्वासू व्यक्तीचा सल्ला व तुमचा पूर्वानुभव याप्रमाणे तुमचे कामाचे नियोजन करा. अचूक वेळी योग्य कृती यश देणार आहे. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहील. गुंतवणूक करण्यास योग्य काळ नाही.

घरामध्ये विनाकारण तप्त वातावरण राहील. नीट समस्या समजून घेऊन सर्वानुमते निर्णय घ्यावा. मुलांकडे विशेष लक्ष द्यावे. जोडीदाराची साथ, मदत मिळेल. कुठल्याही व्यक्तींवर पूर्णपणे विसंबून राहू नका. भावनिक निर्णय भविष्यात त्रासदायक ठरतील.

कार्यक्षेत्रामध्ये अचानक जबाबदारी वाढेल. रेंगाळलेली कामे पूर्ण करण्यासाठी दबाव वाढणार आहे. संयमाने प्रयत्नातील सातत्य टिकवणे हीच कसोटी राहणार आहे. नोकरदारांना विविध आघाड्यांवर लक्ष द्यावे लागेल. व त्यात ते यशस्वी होतील. वरिष्ठांचा असहकार राहील. स्पर्धात्मक व बदलत्या परिस्थितीप्रमाणे तुमचे धोरण बदलणे योग्य ठरेल. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना त्रास जाणवू शकतो.

आरोग्याच्या समस्या कार्यपूर्तीसाठी अडचणी निर्माण करू शकतात. वेळीच उपाययोजना करावी.

**शुभ दिनांक :** ५, ६, ९.

## • मीन

**आठवड्याची** सुरुवात मनासारखी झाली नाही तरी त्यात सुधारणा होईल. मनामधील अस्वस्थता, द्विधा मनस्थिती त्रासदायक ठरू शकते. स्वतःकडूनच झालेल्या चुकांमुळे नुकसान होऊ शकते. नैराश्य टाळून उत्साहात कामामध्ये तुमच्या क्षमतेचा पूर्ण वापर करा. नवीन ओळखीतून संधी मिळतील. अचानक लाभाचे प्रमाण वाढेल. जुनी येणी वसूल करता येतील. आर्थिक गुंतवणूक शक्यतो पुढे ढकलावी किंवा छोट्या प्रमाणात व दीर्घ मुदतीची करा.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. जोडीदाराशी जुळवून घ्यावे लागेल. सुसंवाद महत्त्वाचा आहे. मुलांच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचे व योग्य निर्णय घेतले जातील. घरातील ज्येष्ठ नाराज होणार नाहीत याकडे लक्ष द्या. तुमची क्षमता ओळखून व्यावहारिक निर्णय घ्या. उद्योगव्यवसायात तुमच्या कौशल्याला वाव मिळेल. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करता येईल. योग्य ठिकाणी धाडस दाखवून संधीचा लाभ घ्या. संयम व परिस्थितीचा योग्य अंदाज घेऊन अनेक गोष्टी पार पाडू शकाल. भागीदारीतील व्यवसाय असणाऱ्यांसाठी चांगला काळ आहे. नोकरदारांनी स्वतःच्या कामावरच लक्ष केंद्रित करावे.

मानसिक आरोग्य जपा

**शुभ दिनांक :** ७, ८, ११.

– ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे

नवाकाळ

• मुंबई | रविवार ५ जुलै, २०२६ • पान -८

# पंतप्रधान सोमवारपासून तीन देशांच्या दौऱ्यावर




**नवी दिल्ली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ६ ते ११ जुलै या कालावधीत इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या तीन देशांच्या महत्त्वाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्याचा मुख्य उद्देश हिंद-प्रशांत क्षेत्रात भारताचे धोरणात्मक, आर्थिक आणि द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करणे हा आहे. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात पंतप्रधान मोदी इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्या निमंत्रणावरून जकार्ता येथे द्विपक्षीय चर्चा करतील. ते ऐतिहासिक प्रंबानन मंदिर परिसरालाही भेट देणार आहेत. इंडोनेशियानंतर पंतप्रधान मेलबर्नला पोहोचतील. तिथे ते ऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करतील व गव्हर्नर जनरल सॅम मोस्टिन यांची भेट घेतील. या मुक्कामात 'इंडिया-ऑस्ट्रेलिया सीईओ फोरम'मध्ये उद्योगपतींशी संवाद साधला जाईल. न्यूझीलंड दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात पंतप्रधान मोदी न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्तोफर लक्सन यांच्या भेटीसाठी ऑकलंड येथे असतील. तब्बल ४० वर्षांनंतर कोणत्याही भारतीय पंतप्रधानांची ही न्यूझीलंडला होणारी पहिली अधिकृत भेट आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# कोळीवाड्यांचे सीमांकन सुरू करा

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना १३/०४/२०२२ च्या शासन निर्णयानुसार ठाणे जिल्ह्यातील, ठाणे तालुका, ठाणे शहरातील ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील



चेंदणी कोळीवाडा, महागिरी कोळीवाडा, राबोडी कोळीवाडा, विटावा कोळीवाडा या कोळीवाड्यांच्या सीमांकन सर्व्हेक्षणाची कार्यवाही प्रायोगिक तत्त्वावर लवकरात लवकर सुरू करण्याचे आदेश द्यावे. सीमांकन सर्व्हेक्षणाच्या शासकीय कामात कोळीवाड्यातील भूमिपुत्र समाज सर्वोतोपरी सहकार्य व मदत करेल. या सर्व मागण्यांसाठी गावठाण तसेच पाचही जिल्ह्यांतील कोळीवाड्यांच्या वतीने हा शासननिर्णय काढल्याबद्दल महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र शासन व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही अभिनंदन करण्यात आले. त्यानंतर गेले ५ महिने या विषयाबाबत शासनाच्या सर्व संबंधित विभागाकडे लेखी पत्रव्यवहार व सातत्यपूर्ण पाठपुरावा करीत आहोत. तरी आज रोजीपर्यंत या विषयासंबंधी सविस्तर चर्चा बैठक झाली नाही आणि पाचही जिल्ह्यांतील कोळीवाड्यांच्या सीमांकन सर्व्हेक्षण कामाला सुरुवात झाली नाही. याकरिता शासनाच्या, शासनकर्त्यांच्या व प्रशासकीय अधिकारी

**गावठाण, कोळीवाडे, पाडे संवर्धन समिती (९८२०८८७७५५)**

कोळीवाडे, पाडे संवर्धन समितीच्या वतीने मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागाचे व प्रशासकीय अधिकारी यांना स्मरणपत्र निवेदन देण्यात आले.

पाच जिल्ह्यांतील कोळीवाड्यांचे सीमांकन सर्व्हेक्षण करावे, असा २९ जानेवारी २०२६ रोजी शासननिर्णय निघाला. त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन संपूर्ण भूमिपुत्र समाजाच्या वर्गाच्या हे स्मरणात यावे या आठवणी करिता स्मरणपत्र निवेदन देण्यात आले व जर शासनाने सीमांकन सर्व्हेक्षणाचे काम प्रायोगिक तत्त्वावर शासन ठरवेल त्या कोळीवाड्यात सुरू केले तर त्याला ठाणे जिल्ह्यातीलच नाही तर पाचही सागरी जिल्ह्यांतील कोळीवाड्यांचा व संपूर्ण भूमिपुत्र समाजाचा सर्वोतोपरी सहकार्य करण्याचा मानस आहे, असे स्मरणपत्र निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# खामेनींच्या अंत्यसंस्काराला मुलगा मुजतबासह सर्वोच्च नेते अनुपस्थित



■ तेहरान

**इराणचे** माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यसंस्काराची ६ दिवसांची प्रक्रिया सुरू झाली आहे. काल तेहरानमध्ये त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियान यांच्यासह देशातील प्रमुख नेते उपस्थित होते. मात्र, खामेनी यांचे पुत्र मुजतबा खामेनी या कार्यक्रमाला उपस्थित राहिले नाहीत. अंत्यसंस्कार सोहळ्यासाठी १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. रशिया, चीन, भारत आणि तुर्की यांसारख्या देशांच्या सर्वोच्च नेत्यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली नाही. इराणकडून निमंत्रण देण्यात आले असतानाही या देशांनी कनिष्ठ स्तरावरील प्रतिनिधींना



पाठवले. भारतातून मेहबुबा मुफ्ती उपस्थित होत्या.

पाकिस्तान, इराक, आर्मेनिया, ताजिकिस्तान आणि जॉर्जिया या देशांचे सर्वोच्च नेते सहभागी झाले. भारताकडून परराष्ट्र राज्यमंत्री पबित्रा मार्गेरिटा आणि बिहारचे राज्यपाल सय्यद अता हसनैन यांनी अधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थिती लावली. खामेनी यांचे पार्थिव तेहरानमधील इमाम खोमेनी ग्रँड मुसल्ला येथे आणण्यात आले. येथे विविध देशांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत अंतिम श्रद्धांजली वाहण्यात आली. खामेनी यांच्यासोबत त्यांच्या १४ महिन्यांच्या नातीसह मुलगी, पत्नी आणि जावयालाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अंत्यसंस्काराच्या पार्श्वभूमीवर तेहरानमध्ये लष्कर आणि पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# सहकार हीच सामान्य माणसाची ताकद! फडणवीसांचे वक्तव्य

■ मुंबई

**सहकार** हीच सामान्य माणसाची खरी आर्थिक ताकद आहे. शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत कर्ज, आर्थिक मदत आणि विकासाच्या संधी पोहोचविण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे सहकार, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित 'सहकार गौरव पुरस्कार' सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा गौरव करत केंद्र सरकारच्या स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू करण्याच्या निर्णयाचे कौतुक केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहकार चळवळीचा ऐतिहासिक प्रवास, महाराष्ट्राचे योगदान आणि केंद्र सरकारने सहकार क्षेत्रासाठी राबविलेल्या विविध योजनांचा आढावा घेत भविष्यात सहकार क्षेत्राला अधिक बळ देण्याची भूमिका स्पष्ट केली. 'सहकार गौरव पुरस्कार' सोहळ्यात सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ॲड. दीपक पटवर्धन, डॉ. रेवती पैठणकर,

» पान २ वर

*पोराचा NEET फुटला*
*आईबापाचा TET पण फुटला....*

# जर्मनीत रजेच्या नियमांमध्ये कडक बदल केल्याने वाद

■ बर्लिन

**जर्मनीच्या** आघाडी सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि उत्पादकता वाढवण्यासाठी आजारपणाच्या रजेच्या नियमांमध्ये कडक बदल जाहीर केले. नवीन प्रस्तावित नियमांनुसार १ जानेवारीपासून कर्मचाऱ्यांना आजारी रजेच्या पहिल्या दिवसापासून डॉक्टरांचे प्रमाणपत्र (मेडिकल सर्टिफिकेट) सादर करणे बंधनकारक असणार आहे. या निर्णयावरून जर्मनीतील राजकारण चांगलेच तापले आहे.

सध्या अनेक कर्मचाऱ्यांना फोनवरून डॉक्टरांचा सल्ला घेऊन किंवा काही दिवस विना-प्रमाणपत्र रजा घेण्याची मुभा आहे. हा नियम रद्द करून आता टेलिफोनद्वारे आजारी रजा घेण्याची सोय पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. आता आजारपणाच्या अगदी पहिल्या दिवसापासून डॉक्टरांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. हा निर्णय चॅन्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घोषित केलेल्या ३४-मुद्द्यांच्या आर्थिक सुधारणा पॅकेजचा एक भाग आहे. हा निर्णय घोषित झाल्यापासून कर्मचारी संघटना आणि वैद्यकीय क्षेत्राकडून यावर तीव्र टीका होत आहे.

*एकतर लग्न जमेना म्हणून टेन्शन.*
*जमलंच तर गडावरून ढकलून देण्याचं टेन्शन.*
*लग्न झालंच तर हनीमून ला नेऊन खून करायचं टेन्शन.*
*दोन चार महिने झाले तर निळ्या ड्रमचं टेन्शन...*
*लग्न टिकलं नाही तर पोटगीचं टेन्शन..*

*पूर्वी लग्न म्हटलं की फक्त पोरींना धोका होता.*
*आता पोरं पण सुरक्षित नाहीत.*

*अवघड हाय सगळं*

# रखडलेले मुंबादेवी मंदिराचेही सुशोभीकरण लवकरच सुरू

**मुंबई पालिका ८८ कोटी खर्च करणार**

■ मुंबई

**मुंबईचे** ग्रामदैवत असलेल्या मुंबादेवी मंदिराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आता पालिकेने सिद्धिविनायक मंदिरासारखा सुशोभीकरण प्रकल्प हाती घेतला आहे. गेल्या दोन वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पाचा खर्च सुधारित आराखड्यानुसार १५० कोटींवरून ८८ कोटी करण्यात आला आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

या मंदिर परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचा खर्च दोन वर्षांपूर्वी सुमारे १५० कोटी रुपये अपेक्षित होता. मात्र आता सुधारित आराखडा तयार करून त्यात हा खर्च ८८ कोटींवर आणला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पालिकेच्या मालकीच्या सुमारे ६,७०० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या तीन भूखंडांचा विकास करण्यात येणार आहे. यात दगडी बांधकाम, वारसा जपणारे स्थापत्य घटक, उद्यान व वृक्षारोपण, आकर्षक प्रकाशयोजना, सिंचन व्यवस्था, विद्युत व यांत्रिक कामे, सीसीटीव्ही यंत्रणा, सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली, दिशादर्शक फलक आणि अन्य नागरी सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, काम पूर्ण झाल्यानंतर पाच वर्षे विकसित परिसराच्या संचालन आणि देखभालीची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर असेल.



# भारतात इन्स्टाग्रामवर बाल शोषणाशी संबंधित जाहिराती

■ नवी दिल्ली

**भारतात** इन्स्टाग्रामवर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित प्रचार करणाऱ्या सशुल्क जाहिराती प्रसारित होत असल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. या जाहिराती इन्स्टाग्रामच्या स्वयंचलित मॉडरेशन प्रणालीची मंजुरी मिळाल्यानंतरच प्रसिद्ध झाल्याचे तपासात नमूद आहे. त्यामुळे मेटाच्या जाहिरात पडताळणी यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तपासात इन्स्टाग्रामवर रेप व्हिडिओ आणि चाईल्ड व्हिडिओ अशा शब्दांचा वापर करून जाहिराती दाखवल्या जात असल्याचे आढळले. या जाहिरातींवर क्लिक केल्यानंतर वापरकर्त्यांना थेट टेलिग्रामवरील चॅनेल्सवर नेले जात होते. या चॅनेल्सवर अवघ्या ९९ रुपयांपासून बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्री विक्रीसाठी उपलब्ध आहे.

तपासासाठी भारतात एक बनावट इन्स्टाग्राम खाते तयार करण्यात आले. काही संशयास्पद खात्यांना फॉलो केल्यानंतर अवघ्या काही दिवसांत त्या खात्यावर प्रौढ अश्लील सामग्री आणि अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित सुमारे ३० जाहिराती दिसू लागल्या. यापैकी एका जाहिरातीची तक्रार करूनही इन्स्टाग्रामने सुरुवातीला ती नियमांचे उल्लंघन करत नसल्याचे सांगितले.

*२०२६ हे फुटीर वर्ष म्हणून UN ने घोषित केले आहे.....*
*विश्वसनीय सूत्रानुसार*

# जालन्यात एसटी बसचा अपघात २५ शाळकरी मुलांसह ३० जखमी

■ जालना

**जालना-वडीगोद्री** महामार्गावर आज सकाळी दोन एसटी बसची धडक होऊन २५ शाळकरी विद्यार्थ्यांसह सुमारे ३० प्रवासी जखमी झाले. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. दोन्ही बसचे मोठे नुकसान झाले असून, दोन्ही बसचे चालक गंभीर जखमी आहेत. हा अपघात सकाळी सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास शहापूरजवळील गल्हाटी नदीच्या पुलावर घडला. मानव विकास मिशनची बस भांबेरी येथून ३० शाळकरी विद्यार्थ्यांना घेऊन अंबडकडे जात होती.



त्याचवेळी अंबडहून बीडकडे जाणारी दुसरी एसटी येत असताना दोन्ही वाहनांची धडक झाली. अपघातानंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिक व बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी विद्यार्थ्यांसह इतर प्रवाशांना बसमधून सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर रुग्णवाहिकांच्या मदतीने सर्व जखमींना उपचारासाठी अंबड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातामुळे जालना-वडीगोद्री महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती.

# मुंबईसह राज्यात पावसाचा हाहाकार

» पान १ वरून - मुंबईत अंधेरी आणि मालाड सबवेमध्ये दोन ते अडीच फूट पाणी साचल्याने दोन्ही सबवे वाहतुकीसाठी बंद केला. जोगेश्वरीतील एसआरपी कॅम्प परिसरात तीन ते चार फूट पाणी साचल्याने अनेक वाहने बंद पडली आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतूक कोंडी झाली. या दरम्यान जोगेश्वरी पोलिसांनी लहान शालेय विद्यार्थ्यांना उचलून सुरक्षित ठिकाणी पोहोचवले. पाणी साचल्यामुळे चेंबूरमधील नूर-ए-इलाही सेवा रस्ता, अंधेरीतील वीरा देसाई रोड, स्वामी



अंधेरी पश्चिम

विवेकानंद मार्ग, अंधेरी सबवे, विक्रोळी हुमा मॉल जंक्शन, गांधीनगर जंक्शन आणि परेश पार्क बाजारपेठ परिसरातील रस्ते तात्पुरते वाहतुकीसाठी बंद केले होते. कुर्ला रेल्वे स्थानक आणि विक्रोळी पोलीस ठाणे परिसर जलमय झाला. नवी मुंबईमध्ये एपीएमसी मार्केटमध्ये पाणी शिरले. ठाणे, दिवा, कळवा आणि घोडबंदर परिसरातील सखल भाग जलमय झाले. कल्याणमध्ये काळू नदी प्रवाहीत झाली, आडवली विसवलीमध्ये पाणीच पाणी झाले, बदलापूर - अंबरनाथ मार्गावर पाणी साचले, मुंब्रा येथे संरक्षक भिंत कोसळली.

ठाण्यात वंदना सिनेमागृह, गोखले रोड आणि राम मारुती रोड परिसरात पाणी साचले. याचा विरोध करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे शहराध्यक्ष मनोज प्रधान आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी साचलेल्या पाण्यात टायर ट्यूबवर बसून आंदोलन केले. नालेसफाईसाठी खर्च झालेल्या कोट्यवधी रुपयांचा हिशेब द्यावा आणि कामांची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. १२ बंगला परिसरातही पाणी साचले होते. भिवंडीतील भाजी मार्केटमध्ये पाणी शिरल्याने लहान विक्रेत्यांचे आर्थिक नुकसान झाले. तसेच कामवारी नदीचे पाणी वाढल्याने मंदिरांचे घाट पाण्यात गेले, तीनबत्ती भागात कमरेपर्यंत पाणी साचले तर लगतच्या पाड्यात पाणी शिरण्याचा धोका असल्याने अग्निशमन दल सतर्क झाले.

सिंधुदुर्गच्या देवगड निपाणी या कोकणात जाणाऱ्या एकमेव राज्य मार्गाची फोंडाघाट परिसरात कमी पावसातही चाळण झाली.

नाशिकमध्ये मुंबई नाका परिसरात रस्त्यावर पाणी साचल्याने शहरातील नालेसफाई झालेली नसल्याचे उघड झाले. याशिवाय इगतपुरी येथे रेल्वे रुळावरही पाणी साचले होते. कोल्हापुरात आंबा घाटात पुन्हा दरड कोसळली तर पंचगंगा नदीची पाणी पातळी वाढल्याची नोंद झाली. तर रायगड जिल्ह्यातील पोलादपूर आणि सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरला जोडणारा आंबेनळी घाट दरड कोसळण्याची शक्यता असल्याने ६ जुलैपर्यंत घाट रस्ता बंद ठेवण्यात आला आहे. दरम्यान महाबळेश्वर येथे नावली गावाजवळही रस्ता खचल्याने नागरिकांची गैरसोय झाली. यवतमाळमध्ये यसिंधी गावाजवळील नाल्यावरील पुलावर टाकलेले डांबर अतिवृष्टीमुळे आणि पाण्याच्या प्रवाहामुळे वाहून गेले. धुळ्यात अरुणावती नदीला पूर तर जळगावमध्ये तापी नदीलाही पूर आला होता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एमएमआर, ठाणे, पालघर, रायगड, पुणे आणि नाशिकच्या काही भागांत ६ जुलैपर्यंत अतिमुसळधार पाऊस आणि वादळाचा इशारा आहे. नागरिकांना दर तीन तासांनी एसएमएसद्वारे अलर्ट दिले जात आहेत. अनेक ठिकाणी



भिवंडी भाजी मार्केट

## ४ दिवसांपूर्वी मृत्यू तरीही गटारे उघडी! महापौरांचा पारा चढला



मुंबईत साकीनाका भागात उघड्या गटारामुळे एका व्यक्तीचा चार दिवसांपूर्वी दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतरही महापालिका प्रशासनाने पुरेशी खबरदारी घेतलेली नसल्याचे चित्र आहे. महापौर रितू तावडे यांच्या कॉटनग्रीन परिसरातील पाहणी दौऱ्यादरम्यान एका ठिकाणी झाकण नसलेले उघडे गटार आढळल्याने त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

## दहिसर-अंधेरी 'मेट्रो २ अ' मांडपेश्वर येथे खोळंबली

दहिसर-अंधेरी पश्चिम 'मेट्रो २ अ' मार्गिकेवरील मांडपेश्वर स्थानकात सकाळी तांत्रिक बिघाड झाल्याने मेट्रो सेवा विस्कळीत झाली. सकाळी ११ वाजताच्या सुमारास एक मेट्रो गाडी स्थानकातच अचानक थांबल्याने प्रवाशांचा खोळंबा झाला. बिघाडाची माहिती मिळताच महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमएमओसीएल)ने तातडीने दुरुस्तीचे काम केल्यानंतर दीड तासानंतर मेट्रो सुरळीत झाली. दरम्यान, सेवा पूर्णपणे बंद न ठेवता डहाणूकरवाडी ते दहिसर पूर्व दरम्यान एकाच मार्गिकेवर दोन्ही दिशांनी मेट्रो सुरू होती.



यवतमाळ रस्त्याचे डांबर वाहून गेले

## देशभरात पावसाचा रुद्रावतार गुजरात, काश्मीर, मध्य प्रदेशला झोडपले

**नवी दिल्ली -** देशभर पावसाने रौद्र रूप धारण केले असून, मुसळधार पावसामुळे अनेक राज्यांमध्ये पूरस्थिती, भूस्खलन आणि अपघातांच्या घटना घडत आहेत. गुजरातमधील जुनागढ जिल्ह्यात पुराच्या पाण्यात अडकलेल्या १९ जणांची बचाव पथकांनी सुखरूप सुटका केली, तर मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये पुलावरून जात असताना एक युवक मोटारसायकलसह पुराच्या पाण्यात वाहून गेला. अनेक राज्यांसाठी हवामान विभागाने रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. गुजरातमध्ये मान्सूनच्या जोरदार पावसामुळे जुनागढ जिल्ह्यातील मेंदारडा तालुक्यातील समधियाला गावाजवळ पूरस्थिती निर्माण झाली. पुराच्या पाण्यात एक कार, ऑटो-रिक्षा आणि इको व्हॅन अडकल्या होत्या. बचाव पथकांनी तत्काळ कारवाई करत १९ जणांची सुरक्षित सुटका केली. गिर सोमनाथ जिल्ह्यातील वेरावळ बंदरावर समुद्र खवळल्याने 'धोक्याचा इशारा क्रमांक ३' फडकावला असून, मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला दिला. मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, केरळ, ओडिशा, अरुणाचल प्रदेश, जम्मू-काश्मीरसह देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले. मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये एक युवक पुराच्या पाण्यात वाहून गेला, तर बालाघाटमध्ये पुरात अडकलेल्या १६ जणांची सुखरूप सुटका झाली. राजस्थानातील जयपूरमध्ये रुग्णालयात पाणी शिरले, उत्तर प्रदेशात अनेक भाग जलमय झाले, तर केरळमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. ओडिशातील पाच जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. अरुणाचल प्रदेशात पूरग्रस्त भागांत हेलिकॉप्टरद्वारे मदत पोहोचवली जात आहे. जम्मू-काश्मीरमध्ये भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले असून, दिल्लीसह अनेक राज्यांत पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नका आणि प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सर्व अलर्टचे पालन करा. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे सज्ज असून, परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत.



साताऱ्यात झेडपी अध्यक्षांच्या घरासमोर झाड कोसळले